
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २०५
www.ramprahar.com
रविवार, ११ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पुण्यात आर्थिक वादातून गोळीबार; हल्लेखोराचीही आत्महत्या



**पुणे** : आर्थिक वादातून सराफ व्यावसायिकाने दुकानमालकावर गोळीबार केला आणि त्यानंतर स्वतः आत्महत्या केल्याची घटना पुण्यातील औंध भागात घडली. आकाश गजानन जाधव (वय ३९, रा. बाणेर) असे मृत पावलेल्या दुकानमालकाचे आणि अनिल सखाराम ढमाले (वय ५२, रा. बालेवाडी) असे आत्महत्या केलेल्या सराफ व्यावसायिकाचे नाव आहे. अनिल ज्वेलर्स नावाचे दुकान ढमाले चालवत होते, तर जाधव यांचे बाणेर येथील हाय स्ट्रीटवर दुकान आहे. जाधव यांनी ढमाले यांना १४ वर्षांपासून दुकान भाड्याने दिले होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यात आर्थिक वाद सुरू होता. आता मला पर्याय नाही म्हणून मी हा निर्णय घेत असल्याचे ढमाले यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत आढळले आहे. गोळीबारानंतर ढमाले यांनी स्वतः गोळी झाडत आत्महत्या केली. पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

अंतरंग
भाजप किसान मोर्चातर्फे ग्राम परिक्रमा यात्रा/२
इन्स्टावरील ओळख महागात! वृद्धाची हत्या; आरोपी अटकेत/५
राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंचे यश/८

# आगामी २५ वर्षे देशासाठी महत्त्वाची

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे संसदेत भाषण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येणारी २५ वर्षे देशासाठी महत्त्वाची आहेत. राजकारण, महत्त्वाकांक्षा आपल्या जागी, परंतु देशाच्या अपेक्षा, आकांक्षा पूर्ण होत आहेत. त्यामुळे हा देश इच्छित परिणाम पूर्ण करणार, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.१०) येथे केले.

संसदेत शनिवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा अखेरचा दिवस होता. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७व्या लोकसभेत झालेली कामे, योजना आदींचा लेखाजोखा मांडला. संसदेत राम मंदिरावर आभार प्रस्ताव मांडण्यात आला. त्यावर पंतप्रधान मोदींनी भाषण केले. यामध्ये नवीन लोकसभा बांधण्यापासून ते राम मंदिर बांधण्यापर्यंत त्यांनी मुद्दे मांडले.

१७व्या लोकसभेला देव आशीर्वाद देत आहेत. राम मंदिर उभे राहिले. नवीन लोकसभा बांधण्यासाठी सगळेच चर्चा करीत होते. अध्यक्ष महोदयांच्या निर्णयक्षमतेमुळे ते शक्य झाले. देशाच्या प्रत्येक कोपऱ्यातून खासदारांना शिव्या पडत असत. त्यांना एवढ्या रुपयांत जेवण मिळते, आम्हाला एवढ्या. अध्यक्षांच्या निर्णयामुळे प्रत्येक खासदार एमपी कॅन्टीनमध्ये बाहेरच्या व्यक्तीएवढेच पैसे देतोय. या खासदारांनी कोरोना काळात आपल्या वेतनातून ३० टक्के वेतन कपात करण्यात निर्णय घेतला, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

देशाची पुढील पिढी आपली न्यायसंहिता पाहिल. आपण दहशतवादाविरोधात कठोर कायदे केले. काश्मीरमधील कलम ३७० हटविले. तिहेरी तलाक कायदा महिलाशक्तीला बळ देऊन गेला. हे सर्व काम १७व्या लोकसभेने केले आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

राष्ट्रपिता महात्मा गांधींनी मिठाचा सत्याग्रह केला. ही खूप छोटी घटना वाटत होती, पण हा सत्याग्रह तेव्हा देशाच्या लोकांना एक शक्ती देऊन गेला. आज देश अशाच वाटेवर आहे, असे पंतप्रधानांनी म्हटले.

# उद्धव ठाकरेंच्या डोक्यावर परिणाम झालाय, गेट वेल सून!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रत्युत्तर



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी (दि.१०) पत्रकार परिषद घेत गुन्हेगारीचा मुद्दा उपस्थित करून राज्य सरकार आणि उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. या टीकेनंतर गृहमंत्री फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंच्या डोक्यावर परिणाम झाल्याचे म्हणत टोला लगावला आहे.


गृहमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात ज्या घटना घडल्या त्या व्यक्तीगत वैमनस्यातून घडल्या आहेत. त्यांचे गांभिर्य मी नाकारत नाही, पण व्यक्तीगत वैमनस्यातून या घटना घडल्याने याचा थेट कायदा-सुव्यवस्था आणि राज्याची परिस्थिती याच्याशी संबंध जोडणे अयोग्य आहे. ज्या दोन तीन घटना आहेत त्यामागे वैयक्तिक कारणे, हेवेदावे, भांडणे, व्यवहार आहेत. त्याबाबत आम्ही कडक कारवाई करीत आहोत.

सरकार जर गुंडांच्या मागे उभे राहिले, तर राज्यात खूनखराबे वाढतील, राज्याला मनोरुग्ण गृहमंत्री लाभला आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली होती. यावर बोलताना गृहमंत्री फडणवीस म्हणाले की, त्यांची भाषा आणि शब्द पाहता माझे ठाम मत झालेय की उद्धवजींच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. मी त्यांच्या कुठल्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देणार नाही, पण एवढेच म्हणेन की गेट वेल सून!

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या दाव्यावर बोलताना गृहमंत्री फडणवीस यांनी, वडेट्टीवारांना फार काही माहिती नसते. ते अशा गोष्टी बोलत असतात. कुठल्याही गोष्टीची योग्य प्रकारे चौकशी होईलच, पण अलिकडच्या काळात जगा जासूस तयार झालेत. त्यांनी विचारपूर्वक बोलले पाहिजे, असे म्हटले.

# लोकसभा निवडणुकीपूर्वी ‘सीएए’ लागू करणार

## गृहमंत्री अमित शाहांची मोठी घोषणा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सीएए अर्थात नागरिकत्व सुधारणा कायद्याची अंमलबजावणी आगामी लोकसभा निवडणुकीच्या आधी देशभर केली जाणार आहे, अशी मोठी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी (दि. १०) केली. डिसेंबर २०१९मध्ये संसदेने या कायद्याला मंजुरी दिली होती.

सीएए हा देशाचा कायदा असून याबाबत अधिसूचना काढली जाणार आहे. निवडणुकीपूर्वीच या कायद्याची अंमलबजावणी केली जाईल, असे गृहमंत्री शाहांनी दिल्लीतील ईटी नाऊ ग्लोबल बिझनेस समिटमध्ये जाहीर केले.

सीएए हे काँग्रेसचे वचन होते. देशाची फाळणी झाली तेव्हा देशातील अल्पसंख्याकावर अत्याचार झाले. काँग्रेसने निर्वासितांचे भारतात स्वागत केले आणि त्यांना भारतीय नागरिकत्व दिले जाईल, असे आश्वासन दिले होते, पण ते आता मागे हटत आहेत, अशीही टीका गृहमंत्री शाहांनी या वेळी केली.

आपल्या देशातील अल्पसंख्याकांना आणि विशेषतः मुस्लिम समुदायातील लोकांना त्यांचे नागरिकत्व काढून घेतले जाईल, असे भडकवले जात आहे, परंतु सीएएमुळे कोणाचेही नागरिकत्व हिसकावून घेतले जाणार नाही, कारण त्याबाबत तशी तरतूदच करण्यात आलेली नाही, असे गृहमंत्री शाह यांनी स्पष्ट केले.

## काँग्रेस नेते बाबा सिद्दीकी राष्ट्रवादीत

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे नेते व माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.१०) पक्षप्रवेश झाला. या वेळी त्यांनी काँग्रेसवर टीका केली.

मला राजकारणात इथपर्यंत सुनील दत्त यांनी आणल्याची आठवण बाबा सिद्दीकी यांनी या वेळी काढली. काँग्रेस पक्षात माझे मतभेद झाले, मन दुखावले गेले असे सांगून कढीपत्त्याप्रमाणे आमचा उपयोग झाल्याचेही ते म्हणाले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते काळुंद्रे येथील शाळा इमारतीचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील काळुंद्रे येथील रायगड जिल्हा परिषद मॉन्टेसरी आणि प्राथमिक सेमी इंग्रजी केंद्रशाळा क्रमांक २च्या इमारत दुरूस्तीचे काम नुकतेच पूर्ण झाले. या नूतनीकरण केलेल्या इमारतीचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.१०) करण्यात आले.

उद्घाटन समारंभास भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, गणेश कडू, मनीषा बहिरा, सुजाता पाटील, अभिजीत मटकर, शिक्षणतज्ज्ञ सुनील म्हस्कर, माजी मुख्याध्यापक शंकर म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीचे भास्कर पाटील, राजू पाटील, मुख्याध्यापक संजय घरत, प्रेमलाल धोबी यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

## निवडक

### अभिनेते मिथुन यांची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल



**कोलकाता** : ज्येष्ठ अभिनेते आणि भाजप नेते मिथुन चक्रवर्ती यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना शनिवारी (दि.१०) सकाळी अस्वस्थ वाटत असल्याने कोलकात्यातील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, मिथुन यांचा मोठा मुलगा मिमोहने वडील ठीक आहेत आणि हे त्यांचे रूटीन चेकअप आहे, अशी माहिती दिली.

### मोटरमन गेले अंत्यविधीला; मध्य, हार्बरवरील लोकल रद्द

**मुंबई** : सिंगल पासिंगची घटना घडल्यानंतर मोटरमन मुरलीधर शर्मा यांनी काही कालावधीतच प्रगती एक्सप्रेससमोर उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी घडली, तर रेल्वेने त्याचा अपघाती मृत्यू झाल्याचे म्हटले होते. या मोटरमनच्या अंत्यविधीला अन्य मोटरमन गेले. त्यामुळे शनिवारी (दि.१०) मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावरील सुमारे शंभर लोकल फेऱ्या रद्द झाल्या. **(सविस्तर पान २ वर..)**

## पंतप्रधान मोदींचा अपमान देश सहन करणार नाही!

# पनवेलमध्ये राहुल गांधींचा तीव्र निषेध




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जन्माने ओबीसी समाजातील नाहीत, असे वादग्रस्त विधान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले आहे. या विरोधात देशभर संतापाचा भडका उडाला असून भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये महिला मोर्चा आणि युवा मोर्चाच्या वतीने राहुल गांधी यांचा तीव्र निषेध करण्यात आला. या वेळी राहुल गांधींसह काँग्रेसच्या विरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या.

भाजपच्या पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालय येथे झालेल्या या निषेधावेळी पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, अमित ओझे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर, सुहासिनी केकाणे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, दिनेश खानावकर, रोहित जगताप, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, रूपेश नागवेकर, विनायक मुंबईकर, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, चंद्रकांत मंजुळे, अभिषेक भोपी, कोमल कोळी, संदीप पाटील, तेजस जाधव, देवांशू प्रभाळे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासकामांचा धडाका पाहून विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे. विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नाहीत आणि त्यामुळेच ते जातीपातीचे मुद्दे काढत आहेत, असा आरोप या वेळी करण्यात आला तसेच मोदीजींचा अपमान देश सहन करणार नाही, अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

# लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी (दि.१०) कोल्हापूरमध्ये बोलताना वंचित शेतकऱ्यांना लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी प्रोत्साहन अनुदान ५० हजार रुपये शेतकऱ्यांना देणार असल्याचे सांगितले. पाण्याचे दर कमी करावेत अशी शेतकऱ्यांची मागणी होती. आम्ही ते दर कमी करून पूर्ववत केले आहेत, असेही ते म्हणाले.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड आणि गडहिंग्लज दौऱ्यावर असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा नागरी सत्कार तसेच विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी ते म्हणाले की, घड्याळ तेच, पण वेळ नवी असे धोरण ठरवून आम्ही पुढे जात आहोत. महायुतीच्या काळात आम्ही चांगले काम करीत आहोत. आजच्या घडीला देशात नरेंद मोदी यांच्याशिवाय देशाला पुढे नेणारा नेता दिसत नाही. विशेष म्हणजे ते शिवजयंतीच्या दिवशी महाराष्ट्रात येत आहेत.

कायदा सुव्यवस्थेबाबत विरोधक आरोप करीत आहेत, पण या सर्व प्रकरणांची आम्ही चौकशी करीत आहोत. कायदा आणि संविधान सर्वश्रेष्ठ आहे, असे सांगून दादागिरी व गुंडगिरीला बळी पडू नका, असे आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी या वेळी केले.

# आदिवासी रायगड प्रीमियर लीगचा माडप संघ विजेता

## लीगमधून आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावा -आमदार महेश बालदी



**चौक : प्रतिनिधी**

आदिवासी रायगड प्रीमियर लीगमधून आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावा. त्यासाठी लागणारी मदत आपण करू, असे प्रतिपादन उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी केले. चला खेळूया एकतेसाठी या शीर्षकाखाली आदिवासी रायगड प्रीमियर लीगचे दुसरे पर्व उत्साहात झाले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश बालदी बोलत होते. माडपाई इलेव्हन माडप संघाने या स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

आदिवासी रायगड प्रीमियर लीगचे अध्यक्ष विष्णू खैर, उपाध्यक्ष शरद वाघे, सचिव महादेव पिरकड, खजिनदार प्रकाश पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या क्रिकेट स्पर्धेत संपूर्ण रायगड जिल्ह्यातील ३६ आदिवासी संघांनी भाग घेतला होता. कांढरोली येथील मैदानावर झालेल्या या स्पर्धेस आमदार महेश बालदी यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले आणि खेळाडूंना प्रोत्साहित केले. त्यांच्यासमवेत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी सभापती जयवंती हिंदोळा, प्रफुल्ल विचारे, भाजप खालापूर तालुका मंडल अध्यक्ष प्रवीण मोरे, विधानसभा प्रमुख प्रसाद थोरवे, नेरळ सरपंच उषा पारधी, ठाकूर समाज महिला अध्यक्ष सीमा मेंगाळ, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण समिती सभापती दामू खैर, उद्योजक रामदास काईनकर, नारायण ठाकूर यांची उपस्थिती होती. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनीही स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत श्लोक स्पोर्ट्स इलेव्हन गराडा द्वितीय क्रमांक, सान्वी तनिष्का इलेव्हन मोहपाडा तृतीय, मयूर इलेव्हन संजयनगर चतुर्थ आणि पाचवा क्रमांक मनवा इलेव्हन रानसई संघाने मिळवला. **(पान २ वर..)**

## अंडर १९ वर्ल्डकप भारत-ऑस्ट्रेलिया आज महामुकाबला

**बेनोनी : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेत सुरू असलेल्या १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि.११) भारत आणि ऑस्ट्रेलिया या संघांमध्ये अंतिम सामना रंगणार आहे. उदय सहारनच्या नेतृत्वाखालील युवा भारतीय संघाला इतिहास रचण्याची संधी आहे.

अंडर १९ विश्वचषकात भारतीय संघाचा दबदबा राहिलाय. भारताने आतापर्यंत दहाव्यांदा या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली असून पाच वेळा विश्वचषक उंचावला आहे. यंदाच्या स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत शानदार कामगिरी केली असून सेमीफायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा पराभव करीत सलग सहाव्या विजयाची नोंद केली आहे. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानवर थरारक विजय मिळवून अंतिम फेरी गाठली आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन, पारितोषिक वितरण उत्साहात



## मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्रजी माध्यम विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी (दि.९) उत्साहात झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि महाविद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कला, क्रीडा, वक्तृत्व आणि शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

धरोहर आमची संस्कृती, आमची सभ्यता या शीर्षकाखाली हे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनास ‘रयत’चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, रायगड विभागीय निरीक्षक रोहिदास ठाकूर, शहाजी फडतरे, भाजप ओबोसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, माजी नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत, विकास घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कुसुम म्हात्रे, भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी पं.स. माजी सदस्य रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, शालेय समिती सदस्य आशा भगत, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, संजय म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्रजी माध्यम विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, समन्वयक सारिका लांजुडकर, नेहा खन्ना, कुसुम प्रजापती आदी उपस्थित होते.


या वेळी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने उपस्थित मान्यवर आणि पालकवर्गाला खिळवून ठेवणारे व मंत्रमुग्ध करणारे वैविध्यपूर्ण आविष्कारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

# असंगाशी संग केल्याने उद्धव ठाकरेंची मानसिक स्थिती बिघडली

## ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंची टीका

**नागपूर : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करावी तेवढी त्यांची उंची आणि पात्रता नाही. गेल्या काही दिवसांत त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडले असून त्यांच्या प्रकृतीची अधिकच काळजी वाटू लागली आहे. त्यांची सध्या झालेली ही अवस्था ती त्यांनी स्वतःच्या हाताने करवून घेतली आहे. असंगाशी संग केल्यानंतर असेच होणार, अशी टीका भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. गाव चलो अभियानाच्या माध्यमातून कामठी तालुक्यात



नियोजित उपक्रमावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेतील केलेली विधाने बघता त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडले असून त्यांना आता खरंच उपचाराची गरज आहे. त्यांची विधाने ऐकल्यानंतर ते सध्या प्रचंड मानसिक तणावात आहात हे लक्षात येते. फडणवीस यांच्यावर टीका करताना त्यांनी सर्व मर्यादा ओलांडल्या असून त्यांची कीव वाटू लागली. राजकारणात आपल्या विरोधकांवर टीका करायची असते, पण ती करताना सभ्यता, संस्कृती पाळावी लागते, मात्र उद्धव ठाकरे महाविकास आघाडीत असल्यामुळे सभ्यता राहिलेली नाही. देवेंद्र फडणवीस यांच्यावर ज्या खालच्या भाषेत टीका करीत आहे ती पातळी आम्हाला गाठता येणार नाही, कारण आम्ही सभ्यता आणि संस्कृती पाळणारे आहे, पण त्यांची भाषा, टोमणे यातून त्यांना नैराश्य आले आहे. या बिकट मनोवस्थेतून त्यांनी लवकर बाहेर पडावेत एवढीच प्रार्थना करणे आमच्या हातात असल्याचा आहे.

उपमुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीत खंजीर खुपसला तेव्हाच त्यांनी हक्क गमावला आहे. गेल्या काही दिवसांत त्यांच्याजवळ शिवसैनिक उरले नाही. त्यामुळे ते वैफल्यग्रस्त होऊन असे वक्तव्य करीत आहेत. देवेंद्र फडणवीस हे नागपूर जिल्ह्यातील काटोल मतदारसंघांमध्ये जेव्हा मुक्कामी होते त्या वेळी त्यांच्या कार्यक्रमाला लोकांची गर्दी झाली आणि फडणवीस यांचे स्वागत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी केले, तर त्यांना पक्षातून काढून टाकले. त्यामुळे येणाऱ्या काळात उद्धव ठाकरे यांच्या अवतीभोवती चार पाच माणसे राहतील, अशी टीका बावनकुळे यांनी केली. नाना पटोले आज राष्ट्रपती राजवट लागू करा यासाठी राज्यपालांची भेट घेणार असले तरी तशी स्थिती महाराष्ट्रात नाही, असेही ते म्हणाले.

पुण्यात घडलेल्या घटनेमध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे, पण निखिल वागळे यांनीदेखील बोलताना जरा ताळतम्य बाळगावे, असेही बावनकुळे म्हणाले.

# ग्राम परिक्रमा यात्रेच्या माध्यमातून दोन लाख खेड्यांपर्यंत पोहचणार

### भाजप किसान मोर्चा अध्यक्ष खासदार चाहर यांची माहिती




**मुंबई : प्रतिनिधी**

मोदी सरकारच्या कार्यकाळातील शेतकरी हिताच्या विकास कामांची माहिती देशातील दोन लाख खेड्यांपर्यंत पोहचवण्यासाठी भारतीय जनता पक्ष किसान मोर्चातर्फे १२ फेब्रुवारीपासून ग्राम परिक्रमा यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती किसान मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार जगतप्रकाश चाहर यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यांच्यासमवेत किसान मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व प्रदेश प्रभारी बन्सीलाल गुर्जर, प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे आदी उपस्थित होते.

मोदी सरकारच्या शेतकरी हिताच्या योजनांवर चर्चा तसेच पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पपत्रासाठी शेतकऱ्यांकडून सूचना व अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न या ग्राम परिक्रमा यात्रेतून केला जाणार असल्याचे खासदार चाहर यांनी या वेळी सांगितले.

खासदार चाहर म्हणाले की, १२ फेब्रुवारी रोजी उत्तर प्रदेशमधील मुजफ्फरनगर येथील सुखदेव आश्रमाजवळ होणाऱ्या भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या विशाल सभेने या यात्रेचा प्रारंभ होणार आहे. या वेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, पक्षाचे पदाधिकारी आदी उपस्थित रहाणार आहेत. गावागावांतून गाय, नांगर, ट्रॅक्टर व अन्य कृषी यंत्रांची पूजा करून यात्रेला सुरुवात होणार आहे. पुढे महिनाभर चालणाऱ्या या यात्रेदरम्यान शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी मोदी सरकारने राबवलेल्या योजनांची माहिती शेतकरी, शेतमजुरांपर्यंत पोहचवण्यात येणार आहे. मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांमुळे देशातील शेतकरी आत्मनिर्भर व समृद्ध होत आहे. मोदी सरकारच्या काळात कृषी क्षेत्राचा झालेला विकास, काँग्रेस सरकार आणि भाजपा सरकार यांच्या कामगिरीची तुलनात्मक आकडेवारी या यात्रेदरम्यान शेतकऱ्यांपुढे ठेवण्यात येणार आहे. शेतकऱ्यांबरोबर बैठकांचे आयोजन त्याबरोबरच घरोघरी जाऊन मोदी सरकारच्या विविध योजना व विकासकामांची माहिती देणाऱ्या पत्रकाचे वितरण केले जाईल. प्रगतीशील शेतकऱ्यांचा, सैनिकांचा तसेच देशासाठी हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांचा यात्रे दरम्यान सन्मान केला जाणार आहे.

प्रत्येक दिवशी प्रत्येक जिल्ह्यातील पाच गावांमध्ये ग्राम परिक्रमा यात्रा आयोजित करण्यात येणार असून खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, भाजप जिल्हा पदाधिकारी, मंडल पदाधिकारी या यात्रेत सहभागी होणार आहेत. वकील, डॉक्टर, माजी सैनिक यांनाही या यात्रेत आमंत्रित केले जाणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# मोटरमनच्या अंत्यविधीला सहकारी गेल्याने मध्य, हार्बर लोकल खोळंबल्या

**मुंबई : प्रतिनिधी**

तांत्रिक बिघाड आणि साचलेले पाणी वगळता अविरत धावणाऱ्या लोकल एका वेगळ्याच कारणामुळे खोळंबल्या आहेत. एका मोटरमनचा मृत्यू झाला होता. त्याच्या अंत्यविधीला अन्य मोटरमन आणि रेल्वे कर्मचारी गेल्याने इतर लोकल गाड्या खोळंबल्या. यामुळे मध्य रेल्वे आणि हार्बर रेल्वेवरील लोकल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली असून आतापर्यंत ८४ लोकलसेवा रद्द करण्यात आल्या आहेत. यामुळे शनिवारच्या दिवशी कधीही न थांबलेल्या मुंबईकरांना मनस्ताप सहन करावा लागला.

रात्रीपर्यंत आणखी लोकल रद्द कराव्या लागण्याची शक्यता असून रद्द लोकलचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. शुक्रवारी मुरलीधर शर्मा या मोटरमनने आत्महत्या केली होती. रेल्वेचा रेड सिग्नल त्याने तोडला होता. यामध्ये कारवाई होईल म्हणून त्यान सँडहर्स्ट स्टेशन दरम्यान आत्महत्या



केल्याचा दावा सहकाऱ्यांनी केला होता. तर रेल्वेने त्याचा अपघाती मृत्यू झाल्याचे म्हटले होते. त्याच्या अंत्यविधीला अन्य मोटरमन गेले होते.

या मोटरमनच्या मृत्यूचा निषेध करण्यासाठी या मोटरमनची आपण आता सिंगल ड्युटी करणार असून डबल ड्युटी करणार नाही असा पवित्रा घेतला आहे. दीड-दोन तासांपासून लोकल सीएसएमटी स्थानकात थांबलेल्या आहेत. प्रवाशांना अचानकच्या या आंदोलनामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## चौकडीने केली जबरी मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी सतवंत सिंग, सुखराज सिंग, सुखा सिंग व एका अनोळखी व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

चरंजीत भूपेंद्र सिंग हा पापडीचा पाडा, खारघर येथे राहत असून तो त्याच्या मैत्रिणीसोबत राहतो. त्याची तो तब्येत ठीक नसल्याने घरी होता. त्यावेळी घराच्या टेरेसवर असताना सतवंत सिंग याने हातातील लोखंडी रॉडने डोक्यावर व पाठीत मारहाण केली व त्याचे तीन मित्र सुखराज सिंग, सुखा सिंग व एक अनोळखी इसमाने देखील मारहाण केली. यात चरंजीत सिंग जखमी झाला.

# पनवेल-कर्जत रेल्वेमार्गातील बोगद्याचे दोन किमी खोदकाम पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) हाती घेतलेल्या पनवेल-कर्जत दुहेरी रेल्वेमार्गाचे काम वेगात सुरू आहे. या रेल्वेमार्गात नढाल, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगद्याचे खोदकाम व इतर पायाभूत कामे सुरू आहेत. यापैकी मुंबई महानगरातील सर्वात जास्त लांबीच्या वावर्ले बोगद्याचे काम सुरू आहे. एकूण २.६ किमी लांबीच्या बोगद्याचे दोन किमीचे खोदकाम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत या तिन्ही बोगद्याचे ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे.

मुंबई महानगरातील लोकसंख्या वाढत असून, वाहतूक व्यवस्थेवर ताण येत आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी पर्यायी मार्ग व अतिरिक्त रेल्वे मार्ग तयार केले जात आहेत. एमआरव्हीसीच्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-३ (एमयूटीपी-३) अंतर्गत पनवेल-कर्जतला थेट लोकल व इतर रेल्वे मार्गिका वाढवण्याचे काम सुरू आहे. सध्या पनवेल - कर्जतदरम्यान एकच मार्ग असल्याने मेल, एक्सप्रेस आणि मालवाहू रेल्वे याच मार्गावरून धावतात. या ठिकाणी पनवेल-कर्जत लोकल मार्ग तयार केल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.या रेल्वे मार्गावर नढाल, किरवली आणि वावर्ले असे तीन ३,१४४ मीटर लांबीचे बोगदे उभारण्यात येत आहेत. यापैकी वावर्ले हा बोगदा २,६२५ मीटर लांबीचा आहे. या बोगद्याचे काम पूर्ण झाल्यास तो मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे, तसेच या



मार्गातील नढाल बोगद्याची लांबी २१९ मीटर आणि किरवली बोगद्याची लांबी ३०० मीटर आहे. या तिन्ही बोगदाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. यापैकी वावर्ले बोगद्याचे २,६२५ मीटरपैकी २,०३८ मीटर खोदकाम पूर्ण झाले. तर, नढाल बोगद्याचे पूर्णपणे खोदकाम झाले असून किरवली बोगद्याचे ३०० मीटरपैकी २३४ मीटर खोदकाम पूर्ण झाले आहे. पनवेल-कर्जत दरम्यान २९.६ किमी दुहेरी रेल्वे मार्ग उभारण्यात येत आहे.

> **बोगद्याचे काम करताना त्यात उत्तम प्रकाश व्यवस्था, वायुवीजन यांसारख्या अनेक आधुनिक सुविधेने हा बोगदा सुसज्ज असणार आहे.**
>
> **-सुभाषचंद्र गुप्ता, अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक, एमआरव्हीसी**

# मोदी सरकारच्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेची विक्रमी घोडदौड

## भाजप प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

मोदी सरकारच्या कार्यकाळात आर्थिक क्षेत्रात अनेक धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे देशाची विक्रमी वेगाने प्रगती झाली आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी शनिवारी (दि. १०) केले. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत पाठक बोलत होते.

प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान या वेळी उपस्थित होते. यूपीए सरकारच्या काळातील आर्थिक गैरव्यवहार आणि ढिसाळ, भ्रष्ट कारभाराचे काळे वास्तव जनतेसमोर ठेवणे गरजेचे होते. म्हणूनच केंद्र सरकारने संसदेत श्वेतपत्रिका सादर केली असल्याचे पाठक यांनी नमूद केले.



पाठक यांनी यावेळी, २००४ ते २०१४ या यूपीए सरकारने देशाची अर्थव्यवस्था अस्थिर, कमकुवत करत देश कसा रसातळाला नेला याचा लेखाजोखा सादर केला. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर असंख्य आव्हाने सरकारसमोर होती मात्र या आव्हानांचा प्रभावीपणे सामना करीत, चोख आर्थिक नियोजन व योजनांच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्था जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. नजीकच्या काळात आपली अर्थव्यवस्था तिसऱ्या स्थानावर झेप घेईल, असा विश्वास पाठक यांनी व्यक्त केला.

पायाभूत सुविधा बळकटीकरणाकडे मोदी सरकारने मोठे प्राधान्य दिल्याचे पाठक म्हणाले. मागील १० वर्षांमध्ये देशात ५४ हजार किमी लांबीचे महामार्ग बांधून झाले आहेत.

आज तब्बल एक लाख १७ हजाराहून अधिक स्टार्टअप देशभरात नोंदवले गेले आहेत याउलट यूपीए सरकारच्या काळात केवळ ३५० स्टार्टअप देशात होते. एकूणच गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने देशाचा चौफेर विकास साधल्याचेही पाठक यांनी सांगितले.

# एनएमएमएस परीक्षेत फुंडे हायस्कूलचे घवघवीत यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तु.ह.वाजेकर माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. एनएमएमएस परीक्षा सन २०२३-२४ या शासकीय परीक्षेत विद्यालयाचे नऊ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

निहाल मनोहर भोईर, श्रेयश विकास बनगर, आदित्य सुभाष शिंदे, हरीओम उमेश पवार, करण अंकुश गुट्टे, सुमित अंकुश बुरुंगले, मृण्मयी लहू पाटील, सलोनी सुरेंद्र बोर्ले, नंदिनी विक्रम मस्के हे नऊ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. विभाग प्रमुख वर्षा पाटील आणि संगीता म्हात्रे यांनी विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेचे वार्षिक नियोजन उत्तम प्रकारे केले होते सर्व विषय शिक्षकांनी जास्तीत जास्त प्रश्नपत्रिकांचा सराव करून विद्यार्थ्यांची अधिक तयारी करून घेतली.

प्राचार्य एम. जी. म्हात्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, विभाग प्रमुख, मार्गदर्शक शिक्षक, पालक यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे विद्यार्थ्यांना या परीक्षेत हे उज्वल यश मिळाले आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य आणि गुलाबपुष्प देऊन कौतुक करण्यात आले.

या वेळी पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू आणि सर्व स्कूल कमिटी सदस्य, प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.



पान १ वरुन

## आदिवासी रायगड प्रीमियर लीगचा माडप संघ विजेता

मालिकावीर प्रशांत पवार, उत्कृष्ट फलंदाज अजय भस्मा (गराडा), उत्कृष्ट गोलंदाज राजेश कातकरी (माडप) आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून शैलेश कातकरी (माडप) या खेळाडूंची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि वैयक्तिक चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

चार दिवस रंगलेल्या या स्पर्धेसाठी डी.एन. पवार, शरद ठोंबरे, दामू कातकरी, अशोक पवार, रमेश निरगुडा, जयेश पारधी यांच्यासह आदिवासी खेळाडू, क्रिकेटप्रेमी यांनी मेहनत घेतली.

# 'रोटरी'तर्फे मुरबी शाळेत कर्करोग प्रतिबंधक लसीकरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी खारघर मिड टाउनतर्फे जि. प. शाळा, मुरबी, खारघर येथे शनिवारी (दि. १०) वंचित मुलींना गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. शाळेतील ते १४ वयोगटातील ५० विद्यार्थिनींना लसीकरण केले. याच मुलींना दुचारा डोस सहा महिन्यांनंतर दिला जाईल.

या कार्यक्रमाला रोटरी खारघर अध्यक्ष अनुप गुप्ता, सचिव डॉ. रवीकिरण, सेवा प्रकल्प संचालक शैलेश पटेल, डॉ. चित्रा कुलकर्णी, डॉ. अमोघ शहाणे व इतर रोटरीयन



उपस्थित होते. नवी मुंबईतील आयएपीचे यासाठी सहकार्य लाभले. सर्व डॉक्टरांचे रोटरी खारघरने आभार मानले.

# एचआयव्ही एड्स व लैंगिक आजारांबाबत लोककलेतून जनजागृती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय अंतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अलिबाग येथे प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या वतीने एचआयव्ही एड्स व लैंगिक आजाराबाबत लोककलेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

एचआयव्हीची लागण प्रमुख चार कारणांमुळे होते. जसे एचआयव्ही व्यक्तीसोबत असुरक्षित लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याने, एचआयव्ही व्यक्तीची सुई व सिरिंजचा वापर केल्याने, एचआयव्ही गर्भवती मातेपासून होणाऱ्या बाळाला लागण होते तसेच रक्तपेढीतून एचआयव्हीमुक्त रक्त न घेतल्यामुळे एचआयव्हीची लागण होऊ शकते. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने शासकीय दवाखान्यातील समुपदेशन व तपासणी केंद्रातून एचआयव्हीची तपासणी करणे आवश्यक आहे, असे या वेळी प्रिझम संस्थेच्या कलाकारांनी आपल्या पथनाट्यातून सांगितले. त्याचबरोबर लैंगिक आजाराविषयी काही शंका असल्यास शासकीय टोल फ्री क्रमांक १०९७ यावर कॉल करुन माहित मिळवावी हेदेखील पथनाट्याद्वारे सांगण्यात आले.

अलिबागमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व जिल्हा सामान्य रुग्णालय या ठिकाणी झालेल्या या पथनाट्याचे नेतृत्व प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी यांनी केले, तर कलाकार म्हणून नेहा पाटील, अथर्व भगत, स्वराज वाटकरे, कृतिका पाटील, विपुल पाटील, तुषार राऊळ, साक्षी मगर, स्वराज कोंडगुळी, स्मित पाटील, मनाली पाटील यांनी सहभाग घेतला.

या उपक्रमावेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, जिल्हा सहाय्यक लेखा रवींद्र कदम, जिल्हा सहाय्यक एमअण्डई रश्मी सुंकले, जिल्हा सहाय्यक कार्यक्रम संपदा मळेकर, डापकू अधिकारी व कर्मचारी मोबाईल आयसीटीसी व्हॅन समुपदेशक रामेश्वर मुळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिष नाईक, क्लिनर रूपेश पाटील यांच्यासह जनसमुदाय उपस्थित होता.

# मोहो येथे आमदार निधीतून विकासकामे

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहकार्याने आणि ग्रुप ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे माजी उपसरपंच अक्षता म्हात्रे यांच्या प्रयत्नाने मोहो गाव येथे आमदार निधी अंतर्गत मंजूर झालेल्या विकासकामांचे भूमिपूजन पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. १०) करण्यात आले. या कामासाठी १८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे पूर्ण होते आहे. या अंतर्गत मोहोगाव येथे मोहो गाव अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे आणि मोहो गावातील स्मशानभूमी रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे ही कामे मंजूर करण्यात आली असून या कामाचे भूमिपूजन तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी शिवकर सरपंच आनंद ढवळे, सुकापूर सरपंच राजेश पाटील, सरपंच अशोक पवार, उपसरपंच अरुण जले, जिल्हा परिषद माजी सदस्य तथा तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, माजी सदस्य अमित जाधव, माजी उपसरपंच प्रमोद म्हात्रे, रामदास पाटील, चाहू म्हात्रे, संतोष शेळके, अनंता पाटील, गुरुनाथ भोईर, संतोष पाटील, हभप लक्ष्मण महाराज, हभप पुंडलिक पाटील, हभप गणेश म्हसकर, चेतन मोरे, कविता म्हसकर, सरिता पाटील, विठाबाई पाटील, मिथुन पाटील, सुभाष पाटील, मिलिन म्हसकर, भास्कर पाटील, गणेश पाटील, राहुल पाठे, अंकित म्हात्रे, सागर पाठे, रवी पाठे, अशोक म्हात्रे, जयेश पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील पहिला सिडको पुनर्विकास प्रकल्प भरत एनक्लेव्ह या सहकारी गृहनिर्माण संस्थेचा भूमिपूजन सोहळा शनिवारी (दि. १०) झाला. या भूमिपूजन सोहळ्याला माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी उपस्थिती दर्शवत चेअरमन माजी नगराध्यक्ष संदीप भरत पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

नवीन पनवेल सेक्टर १७ येथे होणारा हा गृहनिर्माण प्रोजेक्ट सुसज्ज सर्व सोईसुविधांनी सज्ज असून या गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन संदीप भरत पाटील आहेत. हा प्रोजेक्ट टीपीव्ही लॅण्ड एलएलपीचा येत असून हा प्रोजेक्ट विश्वकर्मा ग्रुप, टीपीव्ही आणि केदार बिल्डर यांच्या माध्यमातून होत आहे.



या वेळी प्रमुख पाहुणे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासह पोपटलाल वेलजी, पियुष जोशी, रायगड कृषी उत्पादन बाजार समिती संचालक राजेंद्र पाटील, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर यांच्यासह पत्रकार आणि मान्यवर उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चेअरमन माजी नगराध्यक्ष संदीप भरत पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

# मारहाण करून गळ्यातील सोन्याची चेन लांबविली

**पनवेल : वार्ताहर**

दोन अनोळखी व्यक्तींनी चार चाकी गाडीचा दरवाजा उघडून गाडीतून ३० वर्षीय तरुणाला बाहेर काढले व त्याला मारहाण करून त्याच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचून नेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रॉबिन सॅम्युअल सुंदर हा गाव खालापूर येथे राहतो. ८ फेब्रुवारी रोजी त्याच्या मामाचा मुलगा तामिळनाडू येथे रेल्वेने जाणार होता. त्या कारणाने तो पनवेल रेल्वे स्टेशन येथे सोडण्यासाठी आला होता. मारुती सुझुकी झेन कार (एमएच १९ एइ ३७९२) ही पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या पार्किंगमध्ये पार्क केली होती. मामाच्या मुलाला रेल्वेत बसवून रात्री सव्वादहा वाजण्याचे सुमारास तो घरी जाण्यासाठी निघाला. या वेळी दोन अज्ञात व्यक्तींनी त्याची गाडी अडवली व त्यांनी गाडीचा दरवाजा उघडला व त्याला शिवीगाळ केली.

या वेळी एकाने गळ्यात हात घालून १५ ग्राम वजनाचे सोन्याचे चेन हिसकावून घेतली. या वेळी दुसऱ्या व्यक्तीने त्यांना मारहाण केली. झटापटीदरम्यान गळ्यातील सोन्याच्या चेनीचा अर्धा तुकडा त्यांना मिळाला व दोन अनोळखी व्यक्तीने सोन्याचे अर्धी चैन चोरी करून अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले आहेत.

# पॅनकार्ड, आयुष्मान, आधार कार्ड शिबिर उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रुप ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे माजी उपसरपंच अक्षता म्हात्रे यांच्या संयुक्त विद्यमाने आधार, पॅन कार्ड मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन मोहोगाव येथे करण्यात आले होते. या वेळी या शिबिराला पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शनिवारी (दि. १०) भेट दिली.

या वेळी या शिबिरामध्ये नवीन पॅन कार्ड, आयुष्मान, आभा कार्ड, आधार कार्ड तयार करणे, आधार कार्डवर दुरुस्ती तसेच आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक करता येईल यांसारख्या सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या वेळी शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, सुकापूर सरपंच राजेश



पाटील, सरपंच अशोक पवार, उपसरपंच अरुण जले, जिल्हा परिषद माजी सदस्य तथा तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, माजी सदस्य अमित जाधव, माजी उपसरपंच प्रमोद म्हात्रे, रामदास पाटील, चाहू म्हात्रे, संतोष शेळके, अनंता पाटील, गुरुनाथ भोईर, संतोष पाटील, हभप लक्ष्मण महाराज, हभप पुंडलिक पाटील आदी उपस्थित होते.

# दिघाटीत गणेश जन्मोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दिघाटी येथील नवतरुण गणेश मित्र मंडळाच्या वतीने ११ ते १३ फेब्रुवारीदरम्यान माघी गणेशोत्सव साजरा करण्यात येणार असून हे माघी गणेश उत्सवाचे ३३ वे वर्ष आहे. यात प्रामुख्याने धर्मनाथ बीज प्राणप्रतिष्ठा आणि गणेश जन्मोत्सव कथ त्रिवेणी संगम देवभक्त आणि हरिपाठ, किर्तन व महाप्रसाद आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमात १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता काकडा होईल. त्यानंतर सकाळी ८.३० अभिषेक आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेल तालुका भाजपचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, दिघाटी सरपंच रजनी ठाकूर, राजा खारपाटील (चिरनेर), माजी सरपंच अमित पाटील, ग्रामपंचायत माजी सदस्य मनोहर पाटील (दिघाटी), पुंडलिक ठाकूर (खिडूकपाडा), साईचे माजी सरपंच अण्णाशेठ पाटील या सर्वांच्या मुख्य उपस्थितीत अभिषेकाचा कार्यक्रम होणार आहे. तर कलश पूजन नरेश पाटील व ध्वज पूजन हसुराम पाटील यांचे हस्ते होईल. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२. वाजता ह.भ.प. अशोक महाराज जाधव (वडविहार) यांच्या गणेशजन्माच्या कीर्तनाला सुरुवात होईल. यानंतर सायंकाळी ६ ते ७ वाजता बापूजी देव प्रासादिक हरिपाठ मंडळ दिघाटी बुवा सदानंद महाराज, हभप हिरामण महाराज, अर्जुन महाराज यांच्या हरीपाठाचा कार्यक्रम होईल.

रात्री ९ ते ११ वाजता श्री गणेश प्रासादिक नवतरुण भजन मंडळ दिघाटी यांच्या भजनाचा कार्यक्रम होईल. यात बुवा अर्जुन पाटील, गणेश पाटील भाग घेतील. रात्री ११ ते १२ श्रीची पालखी मिरवणूक मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग काशिनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी नवतरुण गणेश मित्र मंडळ, ग्रामस्थ मंडळ, दुर्गादेवी मित्र मंडळ व गुरुवार वाचक मंडळ दिघाटी या मंडळांचे पदाधिकारी विशेष मेहनत घेत आहेत.

# विचुंबेत घरफोडी करणारे दोघे ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील विचुंबे गावाच्या हद्दीत झालेली घरफोडी खांदेश्वर पोलिसांनी तक्रार दाखल होताच अवघ्या २४ तासांत ही घरफोडी उघडकीस आणली असून १०० टक्के मालमत्ता हस्तगत केली आहे.

विचुंबे येथील एका घरात घरफोडी झाली होती. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलीस उप आयुक्त परि ०२, विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपुत यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने या गुन्ह्याचा सीसीटीव्ही व तांत्रिक विश्लेषण करून घरफोडीमधील ११ तोळे वजनाचे ४,५०,००० रुपये सोन्याचे दागिने अशी १०० टक्के मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. अवघ्या २४ तासांत ही घरफोडी उघडकीस आणल्याबद्दल पोलिसांचे कौतुक होत आहे.

# पनवेलमध्ये पाळीव प्राण्यांसाठी लसीकरण; जंतनाशक आरोग्य तपासणी कार्यक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका व मिनिस्ट्री ऑफ पेट्स यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १०) आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पाळीव श्वान व मांजर अँटीरेबीज लस, जंतनाशक आरोग्य तपासणी तसेच मोफत लसीकरण कार्यक्रम नवीन पनवेल येथे जागृती प्रकल्प सभागृहामध्ये घेण्यात आला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, मिनिस्ट्री ऑफ पेट्सचे प्रवीण नावंधर, देवेश नावंधर उपस्थित होते.

मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी या वेळी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्यावतीने करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या कामाची माहिती उपस्थितांना दिली. तसेच रेबीजचा प्रसार कमी करण्यासाठी महापालिकेच्यावतीने भटक्या कुत्र्यांसाठी येत्या २६ फेब्रुवारी ते १ मार्च अँटी रेबीज कॅम्प राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमामध्ये सुमारे ५२३ पाळीव कुत्रा व मांजराची नोंदणी करण्यात आली होती. या वेळी विविध एनजीओचे प्रतिनिधी, पाळीव कुत्रा व मांजराचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

> **कुत्रा आणि मांजर हे पाळीव प्राणी आता माणसाच्या कुटुंबातील सदस्य झालेले आहेत. महापालिकेने या प्राण्यांची नोंद घेऊन त्यांचे स्वास्थ्य उत्तम राहावे यासाठी कार्यक्रम आखणे खूप आवश्यक होते. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून महापालिकेने पुढाकार घेऊन आपली जबाबदारी पार पडली आहे.**
>
> **–प्रशांत ठाकूर, आमदार**

# सीकेटी महाविद्यालय व डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठामध्ये सामंजस्य करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे मंगळवारी (दि.६) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि दर्पण २०२४चे भव्य आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यासाठी प्रमुख अतिथी कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबईचे, प्रो. डॉ. रजनीश के. कामत, संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची



विशेष उपस्थिती लाभली होती.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत व प्रो. डॉ. रजनीश के. कामत यांच्या उपस्थितीत चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) व डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. हा करार ज्ञान सामायिक करण्यासाठी, संसाधनांचा वापर करण्याची संधी देईल आणि आमच्या महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना व्यासपीठ प्रदान करेल. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई मध्ये चार सरकारी संस्थांचे क्लस्टर आहे. त्यामध्ये विज्ञान संस्था,एलफिस्टोन महाविद्यालय, सिडनहॅम महाविद्यालय आणि बीएड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मुंबई यांचा समावेश आहे.

या करारादरम्यान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबईचे डॉ. श्रीनिवास कुलकर्णी, कुलसचिव डॉ. विलास पाध्ये, नोडल ऑफिसर डॉ. विशाल बनेवार, प्रा. डॉ. समाधान वाघमोडे, चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्यशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर आणि आय. क्यू. ए. सी. विभागाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा.जी.एस. साठे आदी उपस्थित होते.

# उरण भोवरा येथे हळदीकुंकू समारंभ

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण नगरपरिषद हद्दीतील भोवरा येथील बाळगोपाल स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या वतीने नुकताच हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सुमारे २५ महिलांनी सहभाग घेतला होता.

महिलांना हळदीकुंकू देऊन भेट वस्तू देण्यात आल्या. या वेळी बाळगोपाल स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या अध्यक्षा रंजना सुर्वे, उपाध्यक्ष सुषमा पाटील, सचिव स्नेहा गुडेकर, सदस्य स्नेहा वर्तक, सायली सुर्वे, स्वाती भोसले, मिनाक्षी हांडे, सुलोचना पाटील, सुलभा पडवळ, राजेश्री गुडेकर आदी उपस्थित होत्या.



# नवीन पनवेलमध्ये माघी गणेश जन्मोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व प्रियदर्शनी महिला मंडळ, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल सेक्टर १७ येथील पी.एल. ५ बिल्डिंग क्रमांक २६ ते ३२ येथे मंगळवारी (दि. १३) माघी गणेश जन्मोत्सव व श्री सत्यनारायणाच्या पूजेचे आयोजन करण्यात आले आहे.



या वेळी प्रमुख उपस्थिती माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लाभणार असून प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारूशीला घरत, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, संदीप पाटील, के.डी.म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते सी.सी. भगत, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, तेजस कांडपिळे, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, वर्षा नाईक, माजी नगराध्यक्षा स्मिता वाणी आदी पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, कार्यकर्ते उपस्थित असणार आहेत.

आयोजित कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सभापती सुशीला घरत, भाजप पनवेल वैद्यकीय सेलच्या अध्यक्षा डॉ. अस्मिता घरत व सहकारी यांनी केले आहे.





# अभिनेता, निर्माता सुजीतकुमारची कहाणी

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

'मेरे सपनो की रानी कब आयेगी तू 'हे आराधना'चे (१९६९) सदाबहार सर्वकालीन टवटवीत गाणे ओठावर येताच त्यासह काय काय आठवते? राजेश खन्नाची जीप चालवत हे सदाबहार गाणे साकारतानाची डोळे मिचकावणे, हातवारे करणे, दिलखुलास हसण्याची हवीहवीशी स्टाईल, रस्त्यालगत जात असलेल्या एक्स्प्रेस ट्रेनच्या खिडकीत बसलेली मुद्दाम म्हणा, आपल्याला उद्देशून होत असलेले गाणे आवडतय म्हणून म्हणा शर्मिला टागोर हे सगळे छान एन्जॉय करतेय, आपल्या हातात असलेल्या एलिस्टर मॅक्लीनच्या 'व्हेन ऐट बेल्स टॉल' या पुस्तकात ती अधूनमधून डोकावतेय, यासह आपल्याला राजेश खन्नाच्या मित्राच्या भूमिकेतील सुजीतकुमारही आठवतो...


सुपर हिट गाणे रसिकांच्या अनेक पिढ्या ओलांडून सतत पुढे जात असतानाच त्या गाण्यातील असे हे सगळेच आठवतात. हीच आपली चित्रपट प्रेक्षक संस्कृती. 'आराधना 'ला एव्हाना तब्बल पंचावन्न वर्ष झाली आणि त्यातील मेरे सपनो की रानी, रुप तेरा मस्ताना, कोरा कागज था यह मन मेरा... वगैरे सगळीच गाणी आजही लोकप्रिय आहेत. आठवली तरी डोळ्यासमोर येतात. दिग्दर्शक शक्ती सामंतांचे हेही एक यशच.


सुजीतकुमारने अनेक हिंदी व भोजपुरी चित्रपटातून भूमिका साकारल्यात आणि या गाण्यातील तोही लक्षात राहिलाय. सुजीतकुमारचा जन्म ७ फेब्रुवारी १९३४ रोजीचा तर मृत्यू ५ फेब्रुवारी २०१० रोजीचा. साल वेगळे. तरी तारखा जवळच्या. म्हणजेच सुजीतकुमारला पंचाहत्तर वर्षांचे आयुष्य लाभले.

सुजीतकुमारचा जन्म उत्तर प्रदेशातील वाराणसीजवळील चकिया या गावचा. मूळ नाव शमशेर बहादूर सिंग. कुटुंबाचा व्यवसाय शेती. शालेय शिक्षणानंतर वकिली शिक्षणासाठी तो बनारसला गेला. कॉलेजमध्ये असतानाच हौस म्हणून नाटकात भूमिका साकारत असे. क्रिकेटमध्येही रस होता. एकदा दिग्दर्शक फणी मुजुमदार त्या कॉलेजच्या नाटकाला प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. त्यांना सुजीतकुमारचे काम आवडले. त्यांच्या हस्ते सुजीतकुमारला अभिनयाचा पुरस्कार देण्यात आला. तेव्हाच फणी मुजुमदार यांनी सुजीतकुमारला चित्रपट क्षेत्रात येण्याचे सुचवले. एक तर ते वय असा सल्ला स्वीकारण्याचे होते आणि दुसरे म्हणजे हा सल्ला फणी मुजुमदार यांचा होता. विशेष उल्लेखनीय गोष्ट, फणी मुजुमदार यांनी आपल्या दिग्दर्शनातील आकाशदीप या चित्रपटासाठी सुजीतकुमारला करारबद्धही केले, पण प्रत्यक्षात या चित्रपटात त्याला भूमिकाच दिली नाही. अथवा नव्हतीच. अशोककुमार, धर्मेंद्र, निम्मी व नंदा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटात सुजीतकुमारसाठी कदाचित एकाही दृश्यासाठी संधी नसेल. चित्रपटाच्या जगात असे होत असतेच पण ते स्वीकारायलाही हवे. आपण आता मुंबईत आलो आहोत, आपल्याला चित्रपटात काम करायचयं हे स्पष्ट असल्यानेच सुजीतकुमारने निराश न होता चित्रपटात भूमिका करायचे ठरवले. त्याला भोजपुरी भाषादेखिल चांगलीच येत होती आणि अशातच भोजपुरी भाषेतील पहिला चित्रपट गंगा मैया तोही पियरी चढाईयो ' (१९६३) या चित्रपटात चक्क नायकाची भूमिका मिळाली. चित्रपट कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट होता आणि नायिका कुमकुम होती. पहिलाच भोजपुरी चित्रपट म्हटल्यावर बिहार, उत्तर प्रदेश येथे चित्रपट गर्दीत चालणारच.

सुजीतकुमारला आता हिंदीत लाल बंगला, सबका उस्ताद, जाल अशा छोट्या क्राईम चित्रपटात अक्षरश: किरकोळ भूमिका मिळत होत्या आणि आपण चित्रपटसृष्टीतच राह्यचं, जसं जसे काम मिळेल ते करीत राह्यचं हा सुजीतकुमारचा फोकस स्पष्ट होता. त्याला यशाची घाईही नव्हती हे त्या काळाचे वैशिष्ट्य. शक्ती सामंता वगैरे काही निर्मात्यांनी सुजीतकुमारला 'मिलते रहो, मेरी फिल्म मे कोई काम हो तो मिल जाएगा' असे सतत आश्वासनही दिले. अशा अनेक गोष्टी चित्रपटसृष्टीचा एक भाग आहेत. सुजीतकुमारला दूर गगन की छांव मे, एक साल पहले अशा काही चित्रपटातून छोट्या छोट्या भूमिका मिळाल्या. काही भोजपुरी चित्रपटातूनही काम मिळत होते.

अशातच रामानंद सागर निर्मित व दिग्दर्शित आणि धर्मेंद्र व माला सिन्हा नायक नायिका असलेल्या 'आंखे' (१९६८) या चित्रपटातील सुजीतकुमारची भूमिका त्याला साधारण ओळख मिळवून देणारी ठरली. आता सुजीतकुमारचा आत्मविश्वास वाढला. त्याला आणखीन चित्रपट मिळू लागले. 'आराधना'साठी दिग्दर्शक शक्ती सामंतांनी लक्षवेधक भूमिका दिली. त्यांच्याच 'अमर प्रेम'मध्येही तो होता. बी. आर. चोप्रा निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित 'इत्तेफाक'मध्ये क्लायमॅक्सला रहस्यभेद होतो तेव्हा







सुजीतकुमारची पोलीस इन्स्पेक्टरची भूमिका महत्वाची ठरते. या तीनही चित्रपटात राजेश खन्ना नायक असून प्रत्येक चित्रपट भिन्न स्वरुपाचा आहे. राजेश खन्ना व सुजीतकुमार यांनी यासह आन मिलो सजना, हाथी मेरे साथी, मेरे जीवन साथी, रोटी, मेहबूबा, अवतार, आखिर क्यू, या चित्रपटात एकत्र काम केले.

सुजीतकुमार चित्रपटसृष्टीत व्यवस्थित स्थिरावला...धरती कहे पुकार के, नया रास्ता, हमराही, आप बिती, मर्डर इन सर्कस, जुगनू, धरमवीर, अदालत, द ग्रेट गॅम्बलर, अब्दुल्ला, गुस्ताफी माफ, पुतलीबाई, द बर्निंग ट्रेन, कामचोर, राम बलराम, कलाबाझ, बैराग, तिरंगा इत्यादी अनेक चित्रपटांत लहान मोठ्या आणि अक्षरश: कोणत्याही स्वरुपाच्या भूमिका साकारल्या. कधी पोलीस तर कधी गुन्हेगार. कधी पोशाखी चित्रपट तर कधी सामाजिक चित्रपट. कधी चांगला मित्र तर कधी चक्क कपटी मित्र. सुजीतकुमारने काहीच गैर मानले नाही. या मनोरंजन क्षेत्रात टिकून राह्यचे तर 'चांगल्या भूमिकेची वाट पहात राहण्यापेक्षा आलेली वा मिळालेली भूमिका चांगल्या प्रकारे साकारावी' हे सूत्र त्याने अंगिकारले. आपण साकारत असलेल्या भूमिकांना चित्रपटसृष्टीत बरेच पर्याय आहेत ही त्याची समज खूपच महत्वाची ठरली. यातून सुजीतकुमार घडला. यशस्वी वाटचाल करीत राहिला.

नरेशकुमार दिग्दर्शित 'टांगेवाला' या चित्रपटात त्याने जमीनदाराची भूमिका साकारलीय. राजेंद्रकुमार नायक असलेल्या या चित्रपटात मुमताज नायिका असून ती या जमीनदाराला जवानी बार बार नहीं आती या नटखट गाण्यात मोहक मादक अदांनी त्याला वश करण्याचा प्रयत्न करते. मेहुलकुमार दिग्दर्शित 'क्रांतीवीर ' त्याचा कलाकार म्हणून शेवटचा चित्रपट.

'आपल्या भोजपुरी भाषेतील' चित्रपटातही काम करीत राहिला. लोहा सिंग,चंपा चमेली, साजन करे कन्यादान, माय के लाल, संपूर्ण तीर्थयात्रा, सैया मगन पहेलवानी मे, गंगा हमार है अशी त्याची भोजपुरी चित्रपटांची संख्या वाढत वाढत राहिली. अशातच पहिला रंगीत भोजपुरी चित्रपट दंगल' मध्येही सुजीतकुमार हीरो. आता त्याला भोजपुरी चित्रपटांचा दिलीपकुमार असं म्हटलं जाऊ लागले. त्याचे भोजपुरी चित्रपट विदेशातही प्रदर्शित होऊ लागले. त्या चित्रपटांचे मार्केट वाढले. सुजीतकुमार एवढ्यावरच थांबला नाही. अनुभवातून बरेच काही शिकला.

सत्तरच्या दशकातील हिंदी व भोजपुरी चित्रपटांतून झालेल्या आर्थिक कमाईतून त्याने जुहू परिसरात छोटासा टुमदार बंगला बांधला. तो बंगला नेमका कुठे आहे माहित्येय? जुहूच्या अमिताभ बच्चनच्या 'प्रतिक्षा बंगल्याच्या बरोबर मागील डाव्या बाजूच्या सुरुवातीचा बंगला सुजीतकुमारचा आहे. म्हणजेच तो अमिताभ बच्चनचा शेजारी. विशेष उल्लेखनीय गोष्ट, फार पूर्वी सुजीतकुमारने या बंगल्यात मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांना छान पार्टी दिली. सुजीतकुमारचा बंगला असणे हे अनेकांना आश्चर्यचकित करणारे. पण पैसा कसा मिळवायचा याचे ज्ञान त्याला होते.

सुजीतकुमारने आणखीन एक विशेष गोष्ट केली. त्याने चित्रपट निर्मितीत पाऊल टाकले. काशिनाथ दिग्दर्शित सेक्स कॉमेडी 'अनुभव' (शेखर सुमन, पद्मिनी कोल्हापूरे, रिचा शर्मा) ही त्याची पहिली चित्रपट निर्मिती. १९८० सालची ही गोष्ट. हा चित्रपट एका तेलगू चित्रपटाची रिमेक होता. म्हणजेच खूपच लवकर त्याने आपला कार्यविस्तार केला. आणि मग टप्प्याटप्प्याने एकेक चित्रपट निर्माण केला. मेहुलकुमार दिग्दर्शित 'आसमान से उंचा' (गोविंदा व सोनम), राकेश रोशन दिग्दर्शित 'खेल' (अनिल कपूर व माधुरी दीक्षित), अब्बास मुस्तान दिग्दर्शित 'दरार' ( ऋषि कपूर, जुही चावला, अरबाझ खान), पद्मकुमार दिग्दर्शित चॅम्पियन (सनी देओल व मनिषा कोईराला), विक्रम भट्ट दिग्दर्शित 'ऐतबार' (अमिताभ बच्चन, जॉन अब्राहम, बिपाशा बसू) या चित्रपटांची निर्मिती केली. दरम्यान काही वर्षांचे अंतर ठेवले. सुजीतकुमारचे दुर्दैव बघा कसे ते, 'खेल' आणि सतिश कौशिक दिग्दर्शित 'रुप की रानी चोरों का राजा' हे चित्रपट मध्यंतरापर्यंत जवळपास सारखेच. फक्त चकचकीतपणात फरक. नायक व नायिका दोघेही चोर. विशेष उल्लेखनीय गोष्ट, या दोन्ही चित्रपटांचे पटकथा लेखक एकच, ते म्हणजे जावेद अख्तर. (सत्तरच्या दशकात सलिम खानसोबत ते ग्रेट पटकथा व संवाद लेखक होते हो.) तोच प्रकार 'दरार' आणि पार्थो घोष दिग्दर्शित 'अग्निसाक्षी' चित्रपटाचा. एकाच विदेशी चित्रपटावरुन हे चित्रपट निर्माण होत गेले आणि 'अग्निसाक्षी ' सर्वप्रथम पडद्यावर येत हिटही झाल्यावर 'दरार 'ची निर्मिती लांबत लांबत गेली. सुजीतकुमार मिडिया फ्रेन्डली होती. 'खेल' आणि 'दरार'च्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी आम्हाला आवर्जून बोलवले. भरपूर गप्पा करत जुन्या आठवणीत नेले. त्याने 'पान खाये सैया हमार' या भोजपुरी चित्रपटाचे दिग्दर्शनही केले. अमिताभ बच्चन व रेखा त्यात पाहुणे कलाकार होते. हे श्रेय सुजीतकुमारचे.

'ऐतबार'नंतर त्याला दुर्दैवाने कर्करोगाने गाठले. ग्रासले. अशातच पत्नी किरणचे २००७ साली निधन झाल्यावर सुजीतकुमार एकदमच निराश झाला. एक मुलगा व एका मुलीचा त्याला आधार होता. आजारपणाच्या काळात राजेश खन्ना, राकेश रोशन अशा अनेकांनी त्याला मदत केली. एकाच क्षेत्रात ते एकाच काळात वाढले, घडले. नावारुपास आले. रणधीर कपूर, सावनकुमार टाक यांच्याशीही त्याचे चांगले संबंध. अखेर ५ फेब्रुवारी २०१० रोजी सुजीतकुमारचे निधन झाले.

रसिकांच्या एका पिढीला सुजीतकुमार चांगलाच माहित आहे. संपूर्ण कारकिर्दीत त्याला कोणताच मानाचा पुरस्कार प्राप्त झाला नाही तरी तो कुठेच थांबला वा रेंगाळला नाही हे जास्त महत्वाचे. म्हणूनच तो यशस्वी ठरला.

---

# एकात्मता मानवतावादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय

पंडित दीनदयाल उपाध्याय हे थोर विचारवंत व चिंतक होते. देश विकासाच्या अनेक मुद्यांवर त्यांनी चिंतन केले. विचार मांडले. त्यांची विचारसरणी पुढे नेत देशाचा विकास करण्याच्या उद्देशाने दिल्लीला १९६८मध्ये दीनदयाल स्मारक समितीची स्थापना झाली. अध्यक्ष अटलबिहारी वाजपेयी तर सचिव नानाजी देशमुख होते. नानाजींनी १९७८मध्ये राजकीय जीवन संपवून समाजकार्यात उडी घेतली. दीनदयाल स्मारक समितीची पुनर्स्थापना केली. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्मता मानवतावादाला जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांतीची जोड देऊन दीनदयाल स्मारक समितीचे 'दीनदयाल शोध संस्थान'मध्ये परिवर्तन करण्यात आले. देशाच्या ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक सुधारणेची पायाभरणी करण्यात आली.

खेड्यात जाऊन तेथील परिस्थितीचे अवलोकन करून तिथल्या लोकांच्या अडचणी समजून आपल्या कार्याची दिशा ठरवण्याकरिता नानाजींनी उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातील जयप्रभाग्राम हे गाव निवडले. आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. हे गाव नेपाळ सरहद्दीजवळ



आहे. तेथील जनता अतिशय गरीब असून जवळच थारू नावाचे आदिवासी क्षेत्र आहे. या जमातीचे लोक हे राणा प्रतापांचे वंशज आहेत. ११ फेब्रुवारी १९७८ रोजी दीनदयाल शोध संस्थानचा पहिला प्रकल्प जयप्रभाग्राम येथे तत्कालीन राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी यांचे हस्ते उद्घाटित झाला. गोपाल अगरवाल, सुरेश देशपांडे, गणेश पाठक, ज्योती मुजुमदार, मालवीय असे धडाडीचे युवा कार्यकर्ते कामाला लागले. कोणतेही काम सुरू करायचे असल्यास त्यांना कार्यकर्ते लागतातच. नानाजींनी भारतीय जनता पक्षातील एकही कार्यकर्ता न हालवता नवीन कार्यकर्त्यांची चमू उभी केली. डॉ. जैन, मलकानी, डॉ. महेश शर्मा आदी अनेक कार्यकर्ते जुळले. अकरा युवा दाम्पत्यांची टीम कामाला लागली. त्यांना 'समाज शिल्पी' म्हणायचे.

शेतीसाठी पाणी गरजेचे होते. नानाजींनी गोंडा परिसरात बोअरवेल खणण्याचे ठरवले. त्यांनी विकसित केलेले बोअरवेलचे तंत्र अतिशय स्वस्त आहे. त्यात पाइपऐवजी बांबू वापरण्यात येतो. या जिल्ह्यामध्ये ४० हजारावर बोअरवेल खणून तो भाग सुजलाम् सुफलाम् केला आहे. या भागात गरिबी व अशिक्षितता असल्यामुळे मृत्यूचे प्रमाण खूप होते. लोकांजवळ औषध घेण्यास पैसे नव्हते. दीनदयाल शोध संस्थानने 'दादी माँ का बटवा' तयार केला. खेड्या-खेड्यात वाटला. आयुर्वेद दवाखाना उघडून लोकांची तपासणीही सुरू केली. शेतकऱ्याची उपजीविका केवळ शेतमालाच्या उत्पन्नावर होत नाही. नानाजींनी मधमाशी पालन, कुक्कुटपालन, डुक्करपालन यासारखे उद्योग प्रकल्प काढून ते यशस्वी करून दाखवले.

समाजाचे अर्थिक उत्पन्न वाढवण्याबरोबरच स्थानिक युवकांच्या बुद्धिमत्तेला वाव देऊ लागले. जयप्रभाग्राममधील नॉनमॅट्रिक कन्हैयालालने ५२ लिटर प्रतिमिनिट आउटपुट असलेला पंप शोधला. बैलाने चालवला जाणारा हा पंप नागपूरचे उद्योगपती पडगीलवार यांनी गोंडा भेटीत पाहिला. कन्हैयालालला व त्या पंपाला घेऊन ते नागपुरात आले. त्यात थोड्या सुधारणा करून परत पाठविला. आज तो 'दीनदयाल पंप' म्हणून प्रसिद्ध आहे. केवळ आठवी पास असलेल्या स्थानिक निवासी हरिरामने आपल्या बुद्धिमत्तेने पायाने चालवता येणारे तागापासून सुतळी बनवण्याचे यंत्र तयार केले. मशिन घरीच असल्यामुळे घरातील सर्व सदस्य वेळ मिळेल तेव्हा सुतळी तयार करू लागले. त्यामुळे कुटुंबाचे उत्पन्नही वाढले. असे अनेक प्रयोग करून नानाजींनी ग्राम विकासाचा पहिला प्रयोग जयप्रभाग्राम येथे यशस्वी करून दाखवला. थारू क्षेत्रातही त्यांनी शाळा व वसतिगृह काढून शैक्षणिक पाया भरला.

गोंडा येथे जसे ग्रामविकास प्रकल्पाचे मॉडेल केले, तसेच नागपूर येथे बालजगत आणि रचनाप्रकल्प, चित्रकूट येथे ग्रामीण विश्वविद्यालय प्रकल्प, बीड येथे ग्रामीण रोजगार प्रकल्प सुरु करून नानाजींनी ग्रामीण विकासाची वाटचाल सुरु झाली. प्रत्येक ठिकाणी ते स्वत: जाऊन संकल्पना तयार करीत. कार्यकर्त्यांची टीम तयार करून त्याच्यावर प्रकल्प सोपवून ते पुढील प्रकल्प उभारणीस लागत. नानाजींच्या चित्रकूट येथील प्रकल्पामध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे दोन दिवस राहिले होते. तेथील काम पाहून भारावून गेले. तेथून मुंबईला गेले. तेथे आयोजित फिल्म फेअर पुरस्कार वितरण समारंभातील भाषणात ते म्हणाले होते, 'आज मी पाहतो आहे की चित्रपटसृष्टीतील सर्व नायक माझ्यासमोर बसले आहे, पण माझे खरे नायक नानाजी देशमुखांबरोबर चित्रकूटला देश विकासाचे काम करीत आहेत.'

**–जगदीश सुकळीकर**

---

# लेखिका गौरी देशपांडे

गौरी देशपांडे या चौकटीबाहेर लिहिणाऱ्या मराठीतील लेखिका म्हणून परिचित होत्या. त्यांचा जन्म ११ फेब्रुवारी १९४२ रोजी झाला. कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, ललितेतर लेखन, भाषांतर, कविता, संशोधन यासारखे बहुतांशी सगळे साहित्यप्रकार गौरी देशपांडे यांनी हाताळले. मराठीबरोबरच त्यांचे बरेचसे इंग्रजी लिखाण तसेच काही इंग्रजी–मराठी व मराठी–इंग्रजी अनुवादसुद्धा प्रकाशित झाले.



प्रसिद्ध लेखिका, संशोधक इरावती कर्वे या गौरी देशपांडे यांच्या मातोश्री होत. दिनकर धोंडो उर्फ डी. डी. कर्वे हे त्यांचे वडील. जाई निंबकर या इंग्रजी व मराठीतील लेखिका त्यांच्या थोरल्या भगिनी. प्रसिद्ध समाजसुधारक व स्त्री–स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे हे डी. डी. कर्वे यांचे वडील व गौरी देशपांडे यांचे आजोबा होते. 'समाजस्वास्थ्य' या लैंगिक शिक्षण देणार्या स्वातंत्र्यपूर्व काळातील मासिकाचे संपादक र. धों. कर्वे हे गौरी देशपांडे यांचे सख्खे काका.

गौरी देशपांडे यांचे पुण्यातच प्रामुख्याने वास्तव्य राहिले आहे. काही काळ मुंबईत, बर्याचशा परदेशवार्या व विंचुर्णी,मराठी साहित्याला स्त्री लेखिकांची मोठी परंपरा लाभली आहे. ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक ह्यांच्यापासून ते अगदी आजच्या कविता महाजन, मोनिका गजेंद्रगडकर ह्याच्यापर्यंत असंख्य स्त्रियांनी निरनिराळ्या पातळीवरून स्त्री आयुष्याच चित्र वाचकांपुढे उभं केलं. ह्या सगळ्या प्रभावळीत गौरी देशपांडे यांनी केलेल्या लिखाणाचं वेगळेपण हे विशेष आहे. त्याआधीच्या बर्याचशा साहित्यात स्त्रियांचे कौटुंबिक प्रश्न किंवा पुरुषी वर्चस्वामुळे निर्माण झालेले प्रश्न चर्चिले गेले होते. गौरी देशपांडे यांची पिढी ही स्वातंत्र्योत्तर पिढी होती.

स्त्रियांपुढचे प्रश्न बदलले होते. संपले नव्हते. स्त्रीने शिक्षणासाठी, नोकरीसाठी घराचा उंबरठा ओलांडण्याची सवय समाजाला झाली होती. गौरी यांची पिढी ह्या प्रश्नांपासून पुढे आली होती. समाजाने स्त्रीकडे 'व्यक्ती' म्हणून बघावं अशा विचारांच्या प्रभावाखाली होती. गौरी देशपांडे यांच्या साहित्याची सविस्तर सूची विद्या बाळ, गीताली वि. म., वंदना भागवत संपादित, मौज प्रकाशन गृह प्रकाशित कथा गौरीची या पुस्तकात वाचावयास मिळते. 'Beetween Births' या १९६८ साली प्रकाशित झालेल्या इंग्रजी काव्यसंग्रहाने गौरी देशपांडे यांचा लेखनप्रवास सुरू झाला.

गौरी देशपांडे यांच्या लेखनात तिच्या मुक्त विचारांचं प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसतं. तिचं लेखन स्त्रीवादी असण्यापलीकडे जाऊन स्वातंत्र्यवादी, व्यक्तिवादी होतं. वेगवेगळ्या पातळीवरचं प्रेम, त्या प्रेमाची मोजावी लागणारी किंमत आणि त्या प्रेमाच्या मर्यादा ह्याबद्दलचे विचार तिच्या लेखनात दिसतात. स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणार्या कोणत्याही आधुनिक, मराठी साहित्यप्रेमी माणसाला गौरी देशपांडे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. तो एक अपरिहार्य टप्पा असतो, असंच तिचं लेखनकर्तृत्व आहे. लेखणीचा 'धीट'पणामुळे विशेष गाजली. दिवाळी अंकांमधून तिनं लिहिलेल्या काही छोटेखानी 'लोक'कथाही लक्षणीय आहेत.

गौरी देशपांडे यांच्या साहित्याबद्दल जी चर्चा झाली, ती मात्र तिने रंगवलेल्या देशीविदेशी प्रियकरांबद्दल आणि नायिकेच्या शरीरसंबंधांबद्दल. गौरीच्या लेखनात ह्या शरीरसंबंधांबद्दल धीट भाष्य आहे. ह्या धीटपणामुळे गौरीवर 'बंडखोर लेखिका' हा शिक्का मारला गेला. ह्या सगळ्या वर्णनातून गौरीने स्त्रियांच्या मानसिक आंदोलनांबद्दल आणि त्यांच्या लैंगिकतेबद्दल जे भाष्य केलं होतं, त्याकडे मात्र दुर्लक्ष झालं. अशा या महान लेखिकेचे १ मार्च २००३ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

# इन्स्टाग्रामवरील ओळख पडली महागात!

## गोव्यातील वृद्धाची हत्या; आरोपींना सुधागडच्या परळी येथे अटक

**पाली : प्रतिनिधी**

गोवा राज्यातील पोरवोरीम येथे ७७ वर्षीय वृद्ध निम्स बादल यांची हत्या करून त्याची गाडी व दागिने घेऊन फरार झालेल्या २२ वर्षीय महिलेसह आणखी एकास नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष-१चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांच्या पथकाने आणि पाली पोलीस स्टेशनच्या पथकाने पाली-खोपोली राज्य महामार्गावर परळीजवळ अटक केली आहे.



या संदर्भात सविस्तर माहिती अशी की, गोवा येथील पोरवोरीम येथील निम्स बादल यांची आरोपी महिला (वय २२) हिच्यासोबत इन्स्टाग्राममार्फत ओळख झाली होती. या ओळखीमुळे निम्स बादल यांनी तिला गोवा फिरण्यासाठी आमंत्रित केले होते. आरोपी महिला, तिचा सहकारी आणि त्यांचा मित्र कुणाल (रा. भोपाळ, मध्य प्रदेश) असे तिघे जण उत्तर गोवा येथील निम्स बादल यांच्याकडे गेले होते. तेथून त्यांना आणण्यासाठी निम्स बादल यांनी गाडीची व्यवस्था केली होती. या सर्वांची राहण्याची व्यवस्था निम्स बादल यांनी त्यांच्या राहत्या बंगल्यात केली होती. या बंगल्यामध्ये रात्रीच्या सुमारास निम्स बादल यांनी या महिलेसोबत गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याशी झालेल्या वादातून आरोपी महिला व तिच्यासोबत असलेल्या दोन जणांनी निम्स बादल यांचा खून केला. त्यांची फॉर्च्युनर कार, अंगावरील दागिने व मोबाईल फोन असा एकूण ४७ लाख ८२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल घेऊन फरार होत महाराष्ट्रात आले होते. आरोपी रायगड जिल्ह्यात आले असल्याची माहिती वाशी, नवी मुंबई येथील गुन्हे शाखा, कक्ष-१चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक सचिन बाराते, हवालदार बालाजी चव्हाण, सुमंत बांगर, विश्वास भोईर यांचे पथक तयार केले तसेच पाली पोलीस स्टेशनच्या मदतीने परळी येथे दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून बादल यांची फॉर्च्युनर कार, अंगावरील दागिने व मोबाईल फोन असा एकूण ४७ लाख ८२ हजार रुपये किमतीचा मुद्दमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# नागोठणे पिगोंडे येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

**नागोठणे : प्रतिनिधी**

पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीत गेल्या पाच वर्षात जवळजवळ साडेपाच कोटी रुपयांची विकासकामे झाली आहेत. सरपंच संतोष कोळी यांच्या नेतृत्वाखाली गावात दर्जेदार विकासकामे झाली असल्याचे कौतुकास्पद उद्‌गार आमदार अनिकेत तटकरे यांनी काढले. पिगोंडे ग्रामपंचायतीला यावर्षी आयएसओ नामांकन प्राप्त झाल्यामुळे त्यांनी अभिनंदन केले.

नागोठणेजवळील पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामांचे उद्‌घाटन व लोकार्पण आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.९) झाले. या वेळी राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, विलास चौलकर, सुधाकर पारंगे, युवा नेते राकेश शिंदे, सचिन कळसकर, प्रमोद जांबेकर, रोशन पारंगे, राजेंद्र ताडकर, संतोष ताडकर, विजय पारंगे, मनोज ताडकर, बाळकृष्ण देवरे, पिगोंडे सरपंच संतोष कोळी, उपसरपंच शैलेश शेलार, सदस्य सखाराम घासे, नाना बडे, धनाजी पारंगे, कांचन माळी, नेत्रा पारंगे, रंजना माळी, गीता पाटील, कुसुम बावकर, ग्रामसेवक विजय अहिरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी स्मशानभूमी संरक्षण भिंत बांधणे, सुशोभीकरण करणे, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे, वेलशेत येथे अंबा नदीकाठी गणपती विसर्जन घाट बांधणे, आंबेघर बौद्धवाडी स्मशानभूमी सुशोभीकरण करणे, आंबेघर येथे नळ पाणीपुरवठा योजना, राजिप शाळा व माध्यमिक शाळा वेलशेत आंबेघर, वेलशेत येथे रस्ते डांबरीकरण करणे, आंबेकर रस्ते डांबरीकरण करणे, आंबेघर बौद्धवाडी रस्ते डांबरीकरण करणे, दिव्यांगांना अपंग कल्याण निधीचे वाटप, महिला बचत गटांसाठी व्यवसायाकरिता प्रत्येक गटासाठी पाच हजार अनुदान तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक लोकार्पण करण्यात आले.

सरपंच संतोष कोळी यांनी सांगितले की, खासदार सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले म्हणून मी निवडणुकीपूर्वी ठेवलेला अजेंडा पूर्ण करू शकलो. मला माझ्या कारकिर्दीत सर्व सदस्य व ग्रामस्थांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केले असल्याचे शेवटी संतोष कोळी यांनी सांगितले.



# जिल्हास्तरीय माहिती प्रशिक्षण व संपर्क मेळावा

## ‘पशुपालकांनी लाभ घ्यावा’

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद येथे मंगळवारी (दि.१३) केंद्र पुरस्कृत अस्कॅड योजनेंतर्गत माहिती प्रशिक्षण व संपर्क घटक योजनेंतर्गत जिल्हास्तरीय माहिती प्रशिक्षण व संपर्क मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याचा जास्तीत जास्त पशुपालकांनी लाभ घेण्याचे, आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. भरत बास्टेवाड, प्रादेशिक सहआयुक्त (पशुसंवर्धन) मुंबई विभागाचे डॉ. प्रशांत कांबळे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे उपस्थित राहून पशुपालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

या मेळाव्यामध्ये पशुधनातील विविध रोग प्रादूर्भाव व त्यांचे नियंत्रण, पशुधनातील लसीकरणाचे महत्त्व, भारत पशुधन प्रणालीद्वारे पशुधनाची नोंदणी तसेच प्राण्यांपासून माणसांना व माणसांपासून प्राण्यांना होणाऱ्या रोगांबाबत प्रामुख्याने बर्ड फ्लू, ग्लॅन्डर्स, रेबीस इत्यादीबाबत जनजागृती तसेच पशुधनाच्या आरोग्याच्या दृष्टीने इतर महत्त्वाच्या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# सर्व्हर डाऊनमुळे आरटीओचे काम ठप्प; वाहनचालक व मालक त्रस्त

**मुरुड : प्रतिनिधी**

मागील गेल्या आठ दिवसांपासून राज्यातील प्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयातील ऑनलाईन यंत्रणा ठप्प झाल्याने वाहनचालक व मालक त्रस्त झाले आहेत.

परवान्याचे काम करणाऱ्या सारथीचे सर्व्हर डाऊन झाल्याने एकही परवाना काढता आला नाही. पेण आरटीओ कार्यालयामध्ये रोजच्या रोज शेकडो वाहने परवाने ऑनलाईन काढले जातात. परवान्याचे नूतनीकरण, परवान्यावरील पत्ता बदलणे, शिकाऊ परवाना काढणे, वाहनांचा टॅक्स, नवीन गाड्या रजिस्ट्रेशन, नव्याने परवाने आदींसह परवाने काढण्यासाठी जिल्ह्यातील नागरिक कार्यालयात ये-जा करीत असतात. शहरातील सायबर कॅफेमध्ये ही ऑनलाईन लायसन्स नूतनीकरण काढले जातात, परंतु सर्व्हर डाऊन मुळे नागरिकांना वाहन चालकांना सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. यामुळे गेले आठ दिवसात लायसन्स नूतनीकरण करणारे हजारो वाहनधारकांना फटका बसला आहे. कामकाज होत नसल्याने नागरिकांना निराश होऊन रिकाम्या हाताने परत परतावे लागत आहेत.

परिवहन विभागाने सर्व्हरमध्ये सुधारणा करून नागरिकांसह चालकांना व मालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सर्वच वाहनचालक करीत आहेत.

# अदानी फाउंडेशनतर्फे करिअर मार्गदर्शन



**मुरुड : प्रतिनिधी**

अदानी फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच भविष्यात दहावी आणि बारावी नंतर कुठल्या क्षेत्रात विविध संधी उपलब्ध आहेत, याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल दिघी तसेच डॉ. ए. आर. उंड्रे इंग्लिश मिडीयम हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय राजपूरी येथे दोन दिवसीय करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक मधुकर चव्हाण, ग्लोबल लर्निंग कन्सल्टंट आणि तज्ज्ञ करिअर समुपदेशक, पुणे यांनी विद्यार्थ्यांना, शिक्षकांना तसेच पालकांना मार्गदर्शन केले. उद्‌घाटन माता सरस्वती यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले. कार्यक्रमाला अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल दिघी येथील मुख्याध्यापक उत्तम वाणी, पर्यवेक्षिका पडवळ मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे सलीम अंतुले, जयदास अंबाजी, त्याचप्रमाणे डॉ. ए. आर. उंड्रे हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथील प्राचार्य रिझवान हूर्झुक, शिक्षक दिनेश डोंगरीकर, अदानी फाउंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे, दिघी पोर्ट लिमिटेड सुरक्षा विभाग प्रमुख चंदरदेव संब्याळ, त्याचप्रमाणे शिक्षक, पालकवर्ग उपास्थित होते.

मधुकर चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना करिअर प्लॅनिंग का आणि कसे करावे, करिअरची योजना कधी करावी, योग्य करिअर कसे निवडावे, नोकरी किंवा व्यवसायासाठी तयार कसे व्हावे करिअरचे वेगवेगळे पर्याय कोणते आहेत, करिअर लक्ष कसे ठरवायचे आणि गाठायचे, दहावी-बारावीनंतर कुठल्या क्षेत्रात विविध संधी उपलब्ध आहेत, असे विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री काळे यांनी केले.


# गणित संबोध परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव हायस्कूल येथे इ. पाचवी व आठवीमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी गणित संबोध परीक्षा घेण्यात आली.

गणितीय संबोध आकलन होण्यासाठी ही परीक्षा महत्त्वाची मानली जाते. नांदगाव हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उत्स्फूर्त सहभाग घेतला असून इ. पाचवीमधील ४१ तर इ. आठवीमधील १२७ असे एकूण १६८ विद्यार्थी या परीक्षेत बसले आहेत.

परीक्षा प्रमुख म्हणून नियती निलेश ठमके यांनी कामकाज पाहिले. जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसावे यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ व पर्यवेक्षिका अर्चना खोत यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी सहाय्यक शिक्षक प्रतीक पेडणेकर, निशा बिरवाडकर, दत्ता खुळपे त्याचबरोबर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस/जनतेस या जाहीर नोटीसी ने कळविण्यात येत आहे की, मौजे वारदोली, ता. पनवेल, जि.रायगड येथील **लक्ष्मीबाई जनार्दन पाटील** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, भोगवटदार वर्ग २ प्रकारची शेतजमीन मिळकत कु.का. कलम प्रमाणे ४३ नियंत्रित सत्ता प्रकारची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे वारदोली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांची नावे | सर्व्हे नं./ गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| लक्ष्मीबाई जनार्दन पाटील | २१ | ३/४/ब | ०-२०-००<br>पो.ख. ०-०७-००<br>**एकुण ०-२७-९०** | २.९३ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/जनतेनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०२/२०२४

**सही /-**
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२ / ९३२२६५२३१९
Email - vijaybhagat43@gmail.com

# स्वच्छता, रस्ता सुलभीकरणासाठी पेण नगरपालिकेतर्फे जनजागृती

**पेण : प्रतिनिधी**

शहरामध्ये फक्त सुशोभिकरणच नव्हे तर सातत्याने स्वच्छताही आवश्यक आहे. प्रशासनाने शहरांच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, त्या अनुषंगाने दर महिन्यात किमान एकदा स्वच्छता अभियान घेण्यात येत असून मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेण शहरातील मुख्य रस्त्यावर स्वच्छता अभियान घेऊन रस्त्याचे सौंदर्याकरण करण्यावर भर दिला जात आहे.

धरमतर रोड येथे शुक्रवारी (दि.९) स्वच्छता अभियानास सुरूवात करण्यात आली. या वेळी रस्त्यालगत असलेली गटारे स्वच्छ करणे, दुभाजक लगत साचलेली माती काढणे, आवश्यक ठिकाणी स्टील कचराकुंडी बसविणे, अतिरिक्त वाढलेल्या झाडांची छाटणी, रस्त्यातील अतिक्रमणे काढणे, रस्त्याच्या दुतर्फा औषध फवारणी आदी उपक्रम राबविण्यात आले. या वेळी मुख्याधिकारी यांनीही अभियानात भाग घेतला.

या अभियानात आरोग्य निरिक्षक शिवाजी चव्हाण, स्वच्छता अभियंता अंकिता इसळ, विद्युत अभियंता रेश्मा करबेले, महेश वडके, उमंग कदम, भरत निबरे, किशोर जाधव, गौतम मोरे व इतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. नगर परिषदेचे सर्व कर्मचारी व नागरिक असे एकूण १३० जणांच्या मदतीने हे अभियान यशस्वी करण्यात आले. अभियानादरम्यान ०.८० किमी रस्ता स्वच्छ करण्यात आला.

दोन ते तीन टन कचरा गोळा करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आंबेगाव येथे वाहतूक करण्यात आला.






## महावितरण — निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्र यांच्या ब्रेकडाऊन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी आणि नवीन सेवा जोडण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास (NSC) योजनेकरिता वर्ष २०२४-२५ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी ई-निविदा क्रमांक टी-०१, टी-०२, टी-०३, टी-०४/२०२४-२५ एकूण ४ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०६.०२.२०२४ ते २०.०२.२०२४ (रात्री ११:५० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता,**
**अलिबाग विभाग**

PRO No.: 238 dtd 05.02.2024

## महावितरण — निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, रोहा कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्र यांच्या ब्रेकडाऊन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी आणि नवीन सेवा जोडण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास (NSC) योजनेकरिता वर्ष २०२४-२५ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी ई-निविदा क्रमांक टी-०१, टी-०२, टी-०३, टी-०४/२०२४-२५ एकूण ४ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०६.०२.२०२४ ते २०.०२.२०२४ (रात्री ११:५० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. २०.०२.२०२४ ला रात्रौ ११:५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता,**
**रोहा विभाग**

PRO No.: 23

## Shri Leuva Patidar Kanya Kelvani Mandal

C/O Ruchi Ceramic, Near Heera Manek Compound,
Jagruti Nagar, Ghatkopar West, Mumbai -400086

**Notice Inviting Tender**

Sealed Tenders are invited Under Two bid System Wide Tender No.SLPKKM/23-24/01

| Name of Work | Tender Fee | EMD | Estimate | Last Date Tender Purchase | Last Date Tender Submission | Tender Openning Date |
|---|---|---|---|---|---|---|
| Construction of Educational Building at Village Nadhal ,Tal – Khalapur, Dist. Raigad | Rs.5000 | Rs. 5 Lacs | Rs. 5 Cr. | 20-02-2024 | 28-02-2024 | 29-02-2024 |

Tender Documents i.e. Tender form and other terms and conditions are part of Tender document which can be purchased from office Contact - Mr. Lalji Bhabhiniya -9324669162, Address - As mentioned Above. Time -10 A.M. to 5.30 P.M.on working days

# नवी मुंबईत बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ

## अल्पवयीन मुली सर्वाधिक शिकार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईमध्ये बालिका आणि महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे. मागील तीन वर्षांत ३८ महिलांच्या हत्येच्या घटना घडल्या. याच कालावधीत अल्पवयीन मुलींवर बलात्काराच्या ३७७ घटना घडल्या तसेच विविध कारणांवरून ४० महिलांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

मागील तीन वर्षांतील महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावणाऱ्या टोळीला अद्याप पोलीस पकडू शकले नाहीत. त्यामुळे शहरात महिला खरेच सुरक्षित आहेत का, असा प्रश्न पडला आहे. २०२३ या मागील वर्षी १७ महिलांनी आत्महत्या केल्याची नोंद नवी मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांत झाली.

नवी मुंबईतील प्रत्येक पोलीस ठाण्यात महिलांच्या समुपदेशनासाठी एक महिला पोलीस अधिकारी नेमली आहे. पोलीस निरीक्षक महिला पोलीस अधिकाऱ्यांची संख्या कमी असली तरी साहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर महिला पोलीस अधिकारी उपलब्ध आहे. तसेच बेलापूर येथे महिलांचे समुपदेशन व कायदेशीर सल्ला देण्यासाठी केंद्र सुरू आहे, मात्र कौटुंबिक हिंसेच्या प्रकाराला सामोरे जाणाऱ्या पीडित महिला या केंद्रापर्यंत पोहचून त्यांच्यापर्यंत खरेच कायद्याचा सल्ला पोहचतो का, असा प्रश्न आहे.

मागील वर्षी ७०३ गुन्हे महिलांविषयक घडले. अनुचित प्रकार घडल्यास नवी मुंबईकरांनी ११२ या टोल फ्री क्रमांकावर फोन केल्यास पहिल्या सहा मिनिटांत फोन करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांची



मदत मिळेल असा दावा नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी केला आहे, मात्र नवी मुंबईत पायी चालणाऱ्या महिलांच्या गळ्यातून मंगळसूत्र चोरणाऱ्यांना पोलीस जेरबंद करण्यात अपयशी ठरले आहे.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सूत्रे हाती घेतल्यावर महिला व ज्येष्ठांच्या सुरक्षेविषयी आश्वासित केले होते. त्यानुसार निर्भया पोलीस पथक प्रत्येक पोलीस ठाण्यात कार्यान्वित केले. होंडा दुचाकी आणि चारचाकी मोटारीतून महिला पोलीस कर्मचारी निर्भया पथकाव्दारे महिलांची मदत करणे हा त्यामागील उद्देश होता. मात्र सध्या त्या चारचाकी मोटारी रस्त्यावर कमी फिरताना दिसतात.

याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या स्तरावर 'सोशल इंजिनिअरिंग'चा अभ्यास करण्याची गरज आहे. मनोविकार तज्ज्ञ, समुपदेशक, मानसशास्त्रज्ञांच्या अभ्यासातून महिलांसाठी विशेष केंद्र चालविणे नवी मुंबईसारख्या आधुनिक शहराची गरज बनली आहे. यासंदर्भात पोलीस उपायुक्त अमित काळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

### महिलांसाठी मदत कक्ष

प्रत्येक पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारावर महिला पोलीस कर्मचाऱ्यांकडे पीडित महिला नि:संकोच तक्रार देऊ शकते यासाठी मदत कक्ष पोलीस आयुक्त भारंबे यांच्या सूचनेवरून सुरू केला. तसेच नेरूळ येथे सावली हे समुपदेशन केंद्र महिलांसाठी सुरू केले. हे सर्व स्वागतार्ह असले तरी नवी मुंबईतील सर्वाधिक कौटुंबिक हिंसेची प्रकरणे ज्या पोलीस ठाण्यात नोंदविली गेली, त्या पोलीस ठाण्याच्या परिसरातील सामाजिक स्थिती नेमकी काय आहे, याचे नेमके विश्लेषण अद्याप केले गेले नाही.

# मॉडर्न कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी साकारल्या प्रतिकृती

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लर्निंग लिंक्स फाउंडेशन व ३६०वन वेल्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्टेम शक्ती टेक फेस्ट २०२३-२४ ही राष्ट्रस्तरीय स्पर्धा रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे शनिवारी (दि. १०) झाली.

यामध्ये मुंबई, रायगड, नवी मुंबई व इतर जिल्ह्यातून एकूण ४०हून अधिक विद्यालयांनी सहभाग घेतला. या फेस्टमध्ये रोबोटिक्स, ए-आर, व्ही-आर, कॉसमो प्लेंच, सुमो फाईट, गेमिंग ॲप्स, पॉकेट कॉम्प्युटर आणि सॉफ्टवेअर ॲप्स अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रतिकृती सादर केल्या. या प्रदर्शनास परिसरातील सर्व शाळांचे विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी भेट दिली.

या प्रदर्शनाला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य दशरथ भगत, ३६० वन वेल्थ फाउंडेशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष गुरुप्रताप सिंग सी एस आर अँड ब्लाईन्ड फिलन्थ्रॉफी ३६० वन वेल्थ फाउंडेशनचे व्यवस्थापक मर्दव गाला, लर्निंग लिंक्सचे वरिष्ठ व्यवस्थापक सचेत सनल, उपाध्यक्ष एम.डी. खमरोद्दीन, मॉडर्न स्कूलच्या प्राचार्य सुमित्रा भोसले आणि पर्यवेक्षक, शिक्षक यांनी भेट दिली.

टेम्स टेक्नोलॉजी - महिलांना मासिक पाळीदरम्यान होणारा त्रास कमी करण्यासाठी एक प्रतिकृती बनविण्यात आली होती. ही प्रतिकृती रिमोटद्वारे चालविली जात असून त्याचे इलेक्ट्रॉड पॅड्स शरीराच्या विविध जागेवर लावल्याने विद्युत तरंग निर्माण होतात व त्यामुळे आराम मिळतो.

बाईक कार - जुन्या दुचाकीच्या इंजिनाचा वापर करून बनविलेल्या कारने प्रेक्षाकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये मुलांनी टाकाऊ दुचाकी गाडीच्या विविध भागांपासून एक तीन चाकी कार तयार केली.

# चार्जिंगला लावलेला मोबाईल चोरणारा १२ तासांत ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

चार्जिंगला लावलेल्या मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अवघ्या १२ तासात सराईत मोबाईल चोरट्यास ताब्यात घेतले आहे. या आरोपीमुळे अनेक मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस येणार आहेत.

रवी बाबू गरड हे नवनाथ नगर, झोपडपट्टी पनवेल रेल्वे स्टेशन, मालधक्का रोड येथे राहतात. ते त्यांच्या लहान मुलासह घराशेजारी बांधलेल्या पत्राच्या खोलीमध्ये झोपले होते. त्यानंतर ते घरातून बाहेर पडले. घरातून बाहेर पडताना पत्रा खोलीचा दरवाजा लावलेला दिसून आला. या वेळी त्यांच्या मुलाने फोनवरून माहिती दिली की सोफ्यावर चार्जिंगला लावलेला मोबाईल दिसून येत नाही. त्यांनी आजूबाजूला शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र मोबाईल सापडला नाही.

पंधरा हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीद्वारे आरोपी विकी उर्फ विजय राज पाटील (रा.दिवा) याने चोरी केल्याचे निष्पन्न झाले व तो पनवेल एस.टी.स्टॅण्ड परिसरात अशाच प्रकारे मोबाईल चोरी करण्याच्या प्रयत्नात फिरत असताना या पथकाने त्याला सापळा रचून त्याला ताब्यात घेतला.

त्याच्याकडून चोरीचा १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल हस्तगत केला आहे. अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# 'दिशा'तर्फे हळदीकुंकू समारंभ



**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

दिशा महिला मंच आयोजित खास 'ती' च्या साठी हळदीकुंकू या उपक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. ३) कामोठे येथील आगरी हॉल या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमीप्रमाणेच हळदी कुंकूची सुरुवात विधवा महिला व L. G. B.T. यांना हळदीकुंकवाचा मान देऊन करण्यात आली. पूर्वापार चालत आलेल्या त्या रुढीला बाजूला सारून सर्वसामान्य स्त्री प्रमाणे तिलाही समाजात तोच मानसन्मान मिळावा हीच भावना ठेऊन हळदीकुंकूचे आयोजन करण्यात आले होते.

> **विधवा महिलांना समाजात अशा समारंभात बाजूला सारले जात म्हणूनच हा पायंडा आम्ही २०२० पासून मोडीत काढत आलेलो आहोत. हा हळदी कुंकवाचा हा थाट खास त्यांच्यासाठीच असतो.**
>
> **-निलम आंधळे, संस्थापक, दिशा संस्था**

या वेळी समाजसेविका इंदू झा मॅडम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. कामोठे येथील साई द्वारका क्लिनिक व नर्सिंग होमचे डॉ. हेमंत पाटील, कांचनमाला इन्फ्रा कंपनीच्या डॉ शर्वरी पाटणे, जयदादा डिगोळे व डॉ. तान्हाजी डेरे यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. लॅब कडून या समारंभात आरोग्यशिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

लावणीच्या तालावर महिलांनी काही परफॉर्मन्स देखील सादर केले व इतर महिलांनाही थिरकायला भाग पाडले. आरती चव्हाण यांनी धमाल, मजेशीर, विविध खेळ खेळत बक्षीसांची लयलूट करत मोठ्या जल्लोषात समारंभ झाला. या वेळी दिशा व्यासपीठाच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळत सर्व महिलांच्या पाठीशी कणखरपणे उभे असल्याचे सांगितले.

या हळदीकुंकू समारंभास कामोठे व परिसरातील महिला मान्यवरांचीदेखील प्रमुख उपस्थिती लाभली.

या समारंभास रेखा ठाकूर, विभावरी शिगवन, सुनीता सुळे, शोभा सपकाळ मंदाकिनी पाटील, ज्योती बोबडे, करुणा कांबळे जयश्री वाघमारे, वंदना पोपळकर, राजश्री थोरात, ज्योती घोलप, शलाका डोके, ज्योती रायबोले, वंदना वाघमोडे, दिक्षा ढोणे सख्यांच्या सहकार्यामुळे समारंभ यशस्वीरित्या पार पडला.

# भाजी मार्केटमध्ये टेम्पो संघटना, पाणपोईचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी भाजी मार्केटमध्ये शिवसेना टेम्पो संघटनेच्या नूतन कार्यालयाचे तथा पाणपोईचे उद्घाटन शिवसेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष विजय चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी नवी मुंबईतील शिवसेनेचे नेते तथा माजी उपमहापौर अशोक गावडे, शेषराव आडे, गणेश पावगे, शिवसेना टेम्पो संघटना अध्यक्ष भीमराव धोत्रे, शिवसेना टेम्पो संघटना सहसचिव रमेश दैने तसेच शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच भाजी मार्केट मधील विविध घटक उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचनिमित्त उपक्रम राबविण्यात आला.

भाजी मार्केटमधील व्यापारी तथा ज्यांना श्रावण बाळ म्हणून सबोधले जाते असे स्व. सोपान मेहेर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पाणपोईचे उदघाटन नवी



मुंबई शिवसेना जिल्हाध्यक्ष विजय चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर शिवसेना टेम्पो संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. या टेम्पो संघटनेच्या अंतर्गत टेम्पो चालकांच्या समस्या शासन दरबारी सोडवल्या जातील तसेच टेम्पो चालकांना या संघटनेच्या मार्फत आपला व्यवसाय वाढीसाठी हक्काचं व्यासपीठ मिळाल्याच विजय चौगुले यांनी सांगितले.

# साईबाबा मंदिर वर्धापन दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील श्री साईबाबा मंदिराचा २६ व्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि. १३) भुपाळी, काकड आरती, महामंगल स्नान, सकाळी ९ ते १२:३० वाजता गायत्री (११ कुंड) यज्ञ, सायंकाळी ६:३० ते ८:३० वाजता श्री साई पालखी मिरवणूक मोहोपाड्यातून काढण्यात येईल.

बुधवारी (दि. १४) वसंत पंचमी प्रमुख उत्सवदिन सकाळी ६ ते ८ वाजता भुपाळी, काकड आरती, ५४ लिटर दुग्धाभिषेक, महामंगळस्नान, गणपती होम, श्री रुद्र एकादशी, पुर्णाहुती गणेश क्रिशनन शास्त्री यांच्याकडून होईल. या वेळी रसायनी सह आसपासच्या परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ६ वा. महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार असून सर्वांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन कार्यकारी मंडळ श्री साईबाबा सत्संग केंद्र रसायनी यांनी केले आहे.

# विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे वैद्यकीय मदत

**उरण : बातमीदार**

विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे जितेश रामकृष्ण भोईर याला २५००० रुपयांची वैद्यकीय मदत केली आहे.

उरण तालुक्यातील कुंडेगाव येथील रामकृष्ण केसरीनाथ भोईर यांचा मुलगा जितेश रामकृष्ण भोईर (वय १६) याला ॲपलआरस्टाईक अनेमिया नावाचा रोग झाला असून त्याच्या डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारासाठी बँन मॅरो ट्रान्सप्लान्ट ऑपरेशनची गरज असल्याचे सांगितले आहे. त्यासाठी काही चाचण्या (तपासण्या) सुध्दा करण्यास सांगितले आहे. या उपचारासाठी ४०,२२,८०० रुपये (चाळीस लाख बावीस हजार आठ्शे रुपये) खर्च लागणार आहेत.

जितेश भोईर याच्यावर तातडीने उपचार करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने जितेशचे वडील रामकृष्ण भोईर यांनी समाजातील दानशूर व्यक्ती, विविध सामाजिक संस्था, संघटना यांना सामाजिक बांधिलकी जपत आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला



प्रतिसाद देत विजय विकास सामाजिक संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत जितेश भोईर याचे वडील रामकृष्ण भोईर यांना जितेशच्या उपचारासाठी पंचवीस हजार रुपये सुपूर्द केले आहेत.

विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोईर, उपाध्यक्ष विकास भोईर यांच्या हस्ते ही पंचवीस हजाराची मदत करण्यात आली.

# खुली कराओके गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

क्लब स्थापनेनंतर अल्पावधीत विविध समाजोपयोगी उपक्रम यशस्वी आयोजित केलेल्या लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे पनवेल मध्ये भव्य कराओके गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धा वयोगट १८ ते ४०, वयोगट ४१ ते ६०, वयोगट ६१ ते पुढे आणि लायन सभासद अशा ४ गटात होणार असून प्राथमिक फेरी रविवारी (दि. ३ मार्च) गोखले सभागृह, पनवेल येथे होणार आहे तर प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी रविवारी (दि. १०) गोखले सभागृह येथे होणार आहे. स्पर्धेसाठी ५०० रुपये प्रवेश शुल्क आहे. प्रत्येक गटातील विजेत्यांना रोख बक्षीस आणि लायन कराओके स्टार आकर्षक ट्रॉफी देण्यात येईल. अधिक माहितीसाठी ला. संजय गोडसे ९८६९३४७३०० किंवा ला. सुरभी पेंडसे ९३२३६७४९८९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा आणि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन सरगम क्लबच्या अध्यक्षा ला. स्वाती गोडसे यांनी केले आहे.

## निवडक

### विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण मोहीम

**नवी मुंबई :** येथील माइंडस्पेस बिजनेस पार्कने नवी मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन शाळेच्या सहकार्याने वृक्षारोपण



मोहिम राबविण्यात आली. या वृक्षरोपण मोहिमेत ९० विद्यार्थी, ११ शाळा कर्मचारी आणि ३५ कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. या वेळी सर्वांनी मिळून विविध प्रजातींची १३० हून अधिक झाडांचे वृक्षारोपण केले. या मोहिमेत विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या झाडांचे प्रकार आणि त्याचे उपयोग याबद्दल माहिती देण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांना माइंडस्पेस बिझनेस पार्क्समध्ये बायो-सोनिफिकेशन प्रक्रियेचे प्रात्यक्षिकदेखील देण्यात आले.

### कराडे खुर्द ग्रामपंचायतीतर्फे उपक्रम

**मोहोपाडा :** रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एम आयडीसी भागातील कराडे खुर्द ग्रुप ग्राम पंचायतीच्यावतीने पाच टक्के अपंग कल्याण निधी व महिला बचत गटांना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत बचत गटांना



सन्मानपत्र व अपंगांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत हद्दीतील २२ अपंग बांधवांना अपंगनिधी अंतर्गत पाच टक्के धनादेश सरपंच भारती हेमंत चितळे, उपसरपंच मिनल धनाजी ठोंबरे, माजी सरपंच किरण माळी, माजी सरपंच विजय मुरकुटे, सदस्य मुकेश पाटील, यशश्री मुरकुटे, प्रमिला पाटील, माधुरी चितळे, नलिनी कांदे, नितेश कारंदे, संतोष म्हात्रे, रेवती भोईर, योगेश मुरकुटे, योगेश पाटील, राजेश सोनावले, विनायक मोडक आदीसह परिसरातील महिला बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'आय लव्ह एग्झाम'वर मार्गदर्शन

**मोहोपाडा :** करिअर कोचिंग क्लासेसच्या वतीने 'आय



लव्ह एग्झाम' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शक सुनील सावंत यांना पाचारण केले. कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन करिअर कोचींग क्लासेसचे संचालक मुफद्दल सर आणि संचालिका जमीला मॅम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वसंत मेमोरियल स्कूलचे अध्यक्ष उल्हासराव देशमुख, दिलीप पोरवाल, दिनकर भूजबळ यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमास लाभली. करिअर कोचिंग क्लासचे माजी विद्यार्थ्यां सुद्धा कार्यक्रमात उपस्थित होते.

### ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार



**नवी मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष आणि शिरवणे विद्यालय व जुनिअर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या माध्यमातून जुईनगर वासियांसाठी महाराष्ट्र जत्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. १ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या जत्रोत्सवाची ११ फेब्रुवारी रोजी सांगता होईल. जत्रोत्सवाच्या आठव्या दिवशी डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या हस्ते प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी जगदीश मढवी, अनिल निकम, नीलम वळवइकर, प्रीती घोलपकर, मंगल बडे, आसावरी परब आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मोहोपाडा येथे माघी गणेशोत्सव

**रसायनी :** श्री गणपती देवस्थान मोहोपाडा येथे सालाबादप्रमाणे साजरा केला जात आहे. १० ते १४ फेब्रुवारी असे रोज पुजा आरती अथर्वशीर्ष रोज होणार आहे. रविवारी (दि. ११) संध्याकाळी सहा वाजता रागपुस्षाजली हा स्थानिक कलाकार याचा गायनाचा कार्यक्रम आहे. सोमवारी श्री व सौ. श्याम कोकीळ यिंचे पंढरीची वारी यावर प्रवचन आहे. दुपारी चार वाजता तुकाराम बुवा लोभी याचा भजनाचा कार्यक्रम आहे. मंगळवारी दुपारी १२.३०ला गणेश जन्माचे कार्यक्रम, संध्याकाळी सहा वाजता प्रथमेश लघाटे याचा प्रथमस्वर ही संगीत मैफिल होणार आहे. बुधवारी लळीताचे कीर्तन, असे पाचही दिवस गणपती उत्सव साजरा केला जाणार आहे.



**रसायनी : महिला ब्राह्मण संघाचा हळदीकुंकू समारंभ उत्साहात झाला. या वेळी संघाच्या सदस्य लतिका गांगल यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले.**

# राजपुरी कोळीवाड्याला संरक्षक भिंतीसाठी निधी मंजूर

## आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नांना यश

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजपुरी कोळीवाडा वरची वसाहतीकरिता संरक्षण भिंत बांधण्यात येणार आहे. याकरिता आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या प्रयत्नातून कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प अंतर्गत दोन कोटी ४८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



यामुळे ७० कुटुंबांला दिलासा मिळणार आहे. राजपुरी वरची वसाहतीकरिता २०२१ या वर्षी संरक्षण भिंत बांधण्यात आली होती, परंतु ती अतिवृष्टीमुळे त्याच वर्षी कोसळली. त्यादरम्यान डोंगराचे भूस्खलन होऊन संरक्षण भिंतीचा शिल्लक राहिलेला भागही पडल्याने १० कुटुंबांना भर पावसात बेघर व्हायला लागले. त्याचखाली आणखी ६० कुटुंबे अशा एकूण ७० कुटुंबांना या दरडीचा धोका निर्माण झाला होता.

यासंदर्भात राजपुरी शिवसेना शाखाप्रमुख बबन शेकजी, गणेश मोन्नाक, धनंजय आंबटकर, भास्कर बानकोटकर, चिंतामणी बानकोटकर, मंगेश कुणबी व वरच्या वसाहतील सर्व सहकारी यांनी आमदार महेंद्र दळवी यांची भेट घेऊन ७० कुटुंबांचा प्रश्न मांडला. आमदार दळवी यांनी पालकमंत्री उदय सामंत यांना पत्र देऊन राजपुरी येथे कायमस्वरूपी उपाययोजनेकरिता भरघोस निधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करून पाठपुरावाही केला. त्यास यश आले असून संरक्षण भिंत बांधण्याकरिता कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत दोन कोटी ४८ लाख रुपये मंजूर करण्यात आले.

# खालापुरात घरफोड्यांच्या घटनांमध्ये होतेय वाढ

**चौक : प्रतिनिधी**

वावंढळ येथील अनंत भिवाजी कदम यांच्या घरातून ४० हजार रुपयांच्या ऐवजासह पाच हजार रोख रक्कम लंपास केली आहे. दुसरी घरफोडी गौरव कदम यांच्या घरी झाली. सुमारे सहा हजार रुपये ऐवजासह १५ हजार रोख घेऊन चोर पसार झाले आहेत. खालापूर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली चौकचे सपोनि युवराज सुर्यवंशी व त्यांचे पोलीस तपास करीत असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्ह्यांची उकल लवकर होईल, असे पोलिसांनी सांगितले.

या परिसरात राहणारे भाडोत्री, परप्रांतीय कामगार, फेरीवाले, भंगार गोळा करणारे यांची ओळख पत्रे, आधार कार्ड यांची माहिती गाव पोलीस पाटील यांनी पोलिसांच्या मदतीने जमा करावीत तसेच जे घरमालक आहेत. त्यांच्याकडून भाडेकरूंची ओळख कागदपत्रे पोलीस ठाणे, ग्रामपंचायत व गाव पोलीस पाटील यांच्याकडे असणे आवश्यक आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.



**रोहा : औद्योगिक क्षेत्रातील एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीत विनोद नामदेव जंगम यांनी प्रामाणिकपणे गेली ३० वर्षे प्रदीर्घ सेवा केली. याबद्दल कंपनीतर्फे त्यांच्या परिवारासह त्यांचा सत्कार करण्यात आला.** (छाया : महादेव सरसंबे)

## निवडक

### रिक्षा संघटनेच्या नामफलकाचे अनावरण



**कर्जत** : रस्ता सुरक्षा अभियान २०२४अंतर्गत काढण्यात आलेल्या रॅलीनंतर नेरळ एसटी स्थानकात जय मल्हार रिक्षा संघटनेच्या नामफलकाचे जय मल्हार रिक्षा चालक मालक सामाजिक संस्था मंडळ यांच्या अधिकृत रिक्षा स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. नेरळ ग्रामपंचायतीच्या सरपंच उषा पारधी आणि पोलीस उपनिरीक्षक दहातोंडे व मंडलिक यांच्या हस्ते जय मल्हार रिक्षा चालक मालक सामाजिक संस्था मंडळ यांच्या अधिकृत रिक्षा स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी श्रावण जाधव, दिनेश कालेकर, संतोष सारंग, भगवान जमघरे, हरेश्वर विरले, रिक्षा स्टँडचे सर्व रिक्षा चालक-मालक, नेरळ पोलीस ठाणे, विभागीय परिवहन विभाग, शालेय विद्यार्थी, रिक्षा संघटना, टॅक्सी संघटना व विद्यार्थी उपस्थित होते.

### मोरे महाविद्यालयात सेफ्टी प्रशिक्षण

**रोहे** : एम. बी. मोरे महिला महाविद्यालयाच्या रसायन शास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींना गॅससिलिंडर आणि केमिकल सेफ्टी या विषयी हुबेक कोलोरंट इंडियातर्फे प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. गॅससिलिंडर सेफ्टी याविषयी हुबेक कंपनीचे पराग फुकणे यांनी माहिती दिली तर केमिकल सेफ्टीविषयी राजीव पडवळ यांनी मार्गदर्शन केले. महिला महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर आणि त्यांच्या सहाय्यक प्रा. निकिता महाडिक, प्रा. मयुरी लहाने, प्रा. सुरभी ठाकूर आणि कर्मचारी वैष्णवी शिंदे, प्रतीक्षा रटाटे आणि ५१ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशोदा प्रजापती तर आभार स्नेहा मेने हिने मानले.

### कर्जतमध्ये भाजपचे गाव चलो अभियान

**कर्जत** : भाजप महाराष्ट्र प्रदेशच्या सूचनेनुसार गाव चलो अभियानाचे नियोजन करून प्रवासी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सुनील गोगटे यांच्या जनसेवा कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. बैठकीत गाव चलो अभियानाची माहिती दिली. गावातील प्रत्येक घरात जाऊन भाजप सरकारच्या योजना समजावून सांगणे ज्यांना लाभ मिळत नाही त्यांना मिळवून देणे, नवमतदारांशी संवाद करणे अशा विविध प्रकाराची महिती देण्यात आली व चर्चा करण्यात आली.



# नागोठणे रस्त्यावर सांडलेल्या ऑईलची तातडीने विल्हेवाट

**अनर्थ टळला; पोलिसांची तत्परता**

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील सर्कलरोड येथून वरवठणे-भिसेखिंडीकडील रोहा दिशेला जाणाऱ्या सुमारे चार किमी रस्त्यावर अज्ञात टँकरला गळती लागून ऑईल सांडले होते. त्याची माहिती नागोठणे पोलीस स्टेशनला मिळताच, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी नितिन राजीवले यांच्या मदतीने ऑईलची विल्हेवाट लावून पुढील होणारा अनर्थ टाळला.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी (दि.९) नागोठणे-भिसेखिंड दरम्यानच्या रस्त्यावर एका अज्ञात टँकरला गळती लागून प्रचंड प्रमाणात ऑईल सांडले होते. याची माहिती मिळताच तत्काळ हवालदार जयेंद्र पाटील, पोलीस नाईक समीर पाटील, वाहतूक पोलीस हवालदार अमोल नलावडे यांनी घटनास्थळी जाऊन कोंडगावचे सामाजिक कार्यकर्ते नितिन राजीवले यांच्या मदतीने माती ऑईल सांडलेल्या रस्त्यावर टाकली.

माती टाकण्याचे काम दोन तास सुरू होते. रोडवर माती टाकल्याने अपघात होऊन घडणारा अनर्थ टाळता आला व वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली.

# खालापूर पंचायत समितीला ओडीएफ दर्जा

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ओडीएफ दर्जा मिळवण्याचा मान मिळवणाऱ्या ठरल्या आहेत. हागणदारीमुक्त दर्जा सर्व ग्रामपंचायतीने मिळवल्याने खालापूर पंचायत समिती ओडीएफ प्लस नामावलीमध्ये पोहोचली आहे.

राजिप अलिबाग येथे ओडीएफ प्लस दर्जा मिळवल्याबद्दल खालापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी सी. एच. राजपूत यांना मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यासाठी ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक यांच्या सहकार्याने खालापूर तालुका हागणदारीमुक्तीमध्ये ओडीएफ प्लस दर्जा मिळण्यात यशस्वी ठरला.

हागणदारीमुक्त होण्यासाठी गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक गटविकास अधिकारी राजपूत, विस्तार अधिकारी अधिकारी महादेव शिंदे, शैलेंद्र तांडेल व पंचायत समिती संदीप मोगारे, रवीकिरण राठोड यांनी परिश्रम घेतले.



# 'जंतनाशक मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत रायगड जिल्ह्यातील एक वर्ष ते १९ वर्षे वयोगटातील पाच लाख ४४ हजार ३९६ मुलामुलींना जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम १३ फेब्रुवारी रोजी राबविण्यात येणार असून या मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांनी केले आहे.

याकरिता सहा लाख अल्बेडॅझोल गोळ्या वितरीत करण्यात आल्या आहेत. तीन हजार ५१८ शाळा, तीन हजार ३२२ अंगणवाड्यांमधून अल्बेडॅझोल गोळया देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम यशस्वी करण्याकरिता ग्रामीण भागातील एकूण ५४ प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच २८० आरोग्य उपकेंद्रे या ठिकाणी कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका सहभाग नोंदविणार आहेत, तसेच शहरी भागामध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रूग्णालय यांच्यामार्फतही मोहीम राबविण्यात येणार आहे.

जंत दोषामुळे बालकांमध्ये ॲनिमियाचा सर्वाधिक धोका उद्भवतो. शिवाय आतड्यांना सूज येणे, पोटदुखी, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार तसेच इतर आजार उद्भवतात. या आजारांना आळा घालण्यासाठी वर्षातून दोन वेळा बालकांनी जंतनाशक गोळी घेणे गरजेचे आहे. ज्या मुलामुलींना कोणत्याही कारणाने १३ फेब्रुवारी रोजी जंतनाशक गोळी मिळाली नाही, तर त्यांना २० फेब्रुवारी रोजी मॉप-अप राऊंडच्या वेळी गोळी देण्यात येणार आहे.

एक वर्ष आतील बालकांना गोळी देण्यात येऊ नये, एक वर्ष ते तीन वर्ष वयोगटातील बालकांना अर्धी गोळी देण्यात यावी, अशा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

# माणगावात नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि. १४) एचडीएफसी बँकेसमोर पेपर विक्रेते नितीन मेथा यांच्या सभागृहात आले आहे. शिबिराचा लाभ समाजातील सर्व गरीब गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी, तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास तीदेखील घेऊन यावीत.

नावनोंदणीकरिता विधिता मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पेण आरटीओतर्फे सुरक्षा मोहिमेंतर्गत महिलांमध्ये जनजागृती

**पेण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२४ अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पेणच्या वतीने रायगड रस्ता सुरक्षा मोहिमेंतर्गत महिलांमध्ये जनजागृती होण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी मंदिर येथे महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि. प. अध्यक्ष निलिमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते हे उपस्थित होते, तसेच सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सुर्यवंशी, मोटार वाहन निरीक्षक शशिकांत तिरसे, अनिस बागवान, विष्णू घोडे आदींसह मोटार वाहन निरीक्षक, आरटीओ महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

वाहन निरीक्षक शशिकांत तिरसे यांनी महिलांना वाहन चालविताना घेण्याची काळजी, पाळावयाचे नियम याविषयी सविस्तर माहिती दिली. प्रश्नमंजुषा विजेत्या मान्यवरांच्या हस्ते हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

या वेळी हळदीकुंकू, तिळगूळ वाटप, रस्ता सुरक्षा संदर्भात उखाणे स्पर्धा व रस्ता सुरक्षासंदर्भात प्रबोधन आदी कार्यक्रम झाले.



# रोह्यातील मुक्या प्राण्यांचा देवदूत

## कुमार देशपांडे यांच्याकडून हजारो प्राण्यांना जीवदान

**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा शहरात देशपांडे वाडा येथे राहणारे सर्पमित्र तसेच प्राणीमित्र कुमार वसंत देशपांडे हे त्यांची पत्नी अमिता कुमार देशपांडे यांच्या साथीने गेली ३० वर्षे जखमी अवस्थेत इतरत्र पडलेले निराधार, अनाथ, भटके, कुत्रे, गाय, बैल, मांजर आदी मुक्या प्राण्यांवर त्या ठिकाणी जाऊन स्वखर्चाने उपचार करतात. त्यामुळे हम दाम्पत्य जखमी प्राण्यांसाठी देवदूत ठरत आहे.

कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी अथवा स्वार्थ न ठेवता केवळ परमेश्वर आपल्याकडून हे काम करून घेत आहे, असा स्वाभिमान बाळगत त्यांनी आजवर हजारो मुक्या प्राण्यांवर उपचार करून जीवनदान दिले आहे. त्यामुळे संपूर्ण रायगडात त्यांची मुक्या प्राण्यांचा देवदूत अशी ओळख झाली आहे.

प्राणीमित्र कुमार देशपांडे यांना अनाथ प्राण्यांना मदत करण्याची सवय त्यांच्या शालेय जीवनापासूनच लागली. त्या वेळी सर्पमित्र दुर्मिळ होते. तेव्हा शाळेत तसेच परिसरातील



विविध ठिकाणी विषारी अथवा बिनविषारी सर्प पकडून ते जंगलात सोडत असत. काही वर्षानंतर रोहे परसरातील वेगवेगळ्या ठिकाणी अपघातात जखमी होऊन रस्त्यालगत पडलेल्या मुक्या प्राण्यांना आपल्या हातून सेवा व्हावी, या उदात्त हेतूने त्यांनी अशा निराधार, अनाथ प्राण्यांना मदत करण्याचे ठरविले.

तेव्हा अनेक भटके कुत्रे सडलेल्या, भाजलेल्या तसेच जखमी अवस्थेत रस्त्यावर किंचाळत पडलेले त्यांना दिसले. त्याचबरोबर रस्त्यांवर होणाऱ्या अपघातामुळे गाई, बैल मांजरी आदी प्राणीदेखील जखमी अवस्थेत पडलेले पाहिले. तेव्हा त्या मुक्या निराधार प्राण्यांची व्याकुळता पाहून ते हळहळले. तेव्हापासून सदर ठिकाणी जाऊन अशा प्राण्यांवर त्यांनी उपचार सुरू केले. गंभीर जखमी प्राण्यांना आपल्या घरी आणून पिंजऱ्यात ठेवून औषधोपचार करतात. तसेच खाद्यपदार्थ देतात, असे त्यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले की, या उपचारासाठी कोणत्या संस्थेकडून मदत न घेता स्वखर्चाने हे उपचार केले जातात. दररोज पाच ते सहा अपघाती निराधार पशुपक्ष्यांवर उपचार केले जातात, मात्र त्यांच्यावर होणारा खर्च हा हजारोंच्या पटीने असतो. यासाठी त्यांना अनेक वेळा मदतीची गरज असते.

काही समाजकंटक अशा भटक्या कुत्र्यांपासून होणाऱ्या त्रासामुळे त्यांच्या अंगावर गरम पाणी ओतणे, वार करणे, दगडाने जखमी करणे अशा प्रकारचे क्रूर व निर्दयी कृत्य करतात. अशा अवस्थेतील प्राण्यांना पकडणे सोपे नसते, परंतु त्यांच्या प्रति असलेल्या प्रेमापोटी कुमार देशपांडे यांना वाईट वाटते व त्या ठिकाणी जाऊन ते उपचारासाठी आपल्या प्राणी वृद्धाश्रमात आणून उपचार करून पूर्णतः बरे करतात, मात्र अशा क्रूर व निर्दयी नगरिकांबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

या कार्यासाठी कुमार देशपांडे यांनी सर्प पशुपक्षी वृद्ध सेवा मंडळ रोहा या नावाने संस्था स्थापन केली आहे, तरी आपल्या परिसरात कोणालाही अशा प्रकारचे मुके अनाथ प्राणी अथवा पशु पक्षी सापडल्यास संस्थेसी संपर्क करावा, असे आवाहन प्राणीमित्र कुमार देशपांडे यांनी प्राणीमित्र तसेच सर्पमित्रांना केले आहे. शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आर्थिक मदत करणे गरजेचे असल्याचे मत परिसरातील नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# इंग्लंडविरुद्ध उर्वरित तीन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघ जाहीर

## लोकेश राहुल, रवींद्र जडेजाचे पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील उर्वरित तीन सामन्यांसाठी संघाची घोषणा केली आहे. मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज लोकेश राहुल आणि अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाचे संघात पुनरागमन झाले आहे, परंतु बीसीसीआयने स्पष्ट केलेय की हे दोन्ही खेळाडू फिटनेस टेस्टमध्ये पास झाले, तरच त्यांचा अंतिम ११ जणांच्या संघात समावेश केला जाऊ शकतो.

भारताच्या वरिष्ठ निवड समितीने शुक्रवारी (दि.९) बोलावलेल्या बैठकीत इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित तीन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली. त्यानंतर शनिवारी सकाळी या संघाची घोषणा करण्यात आली. निवड समितीने संघात फार मोठे फेरबदल केलेले नाहीत. केवळ आकाश दीप या नव्या खेळाडूचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. स्टार फलंदाज विराट कोहली हा इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचबरोबर दुखापतीमुळे श्रेयस अय्यरला भारतीय संघातून वगळण्यात आले आहे.



### दुखापतीमुळे श्रेयस बाहेर

विराट कोहलीपाठोपाठ भारताचा मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरदेखील मालिकेतून बाहेर पडला आहे. दुखापतीमुळे तो उर्वरित मालिकेला मुकणार आहे. बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये सध्या त्याच्यावर उपचार चालू आहे. बीसीसीआय त्याच्या सुधारणेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

विराट आणि श्रेयसचा संघात समावेश न झाल्यामुळे सरफराज खान आणि रजत पाटीदारच्या संघातील स्थानाला धक्का लागलेला नाही.

भारतीय क्रिकेटरसिकांना विराटला पांढऱ्या जर्सीत पाहण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. विराटने इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतील त्याच्या अनुपस्थितीबाबत संघ व्यवस्थापन आणि निवड समितीला कळवले आहे. वैयक्तिक कारणांमुळे तो या मालिकेत खेळू शकणार नाही. त्यामुळे पदार्पणानंतर पहिल्यांदाच विराट घरच्या मैदानावर होणाऱ्या मालिकेला मुकणार आहे.

**असा आहे संघ**

रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, के.एल. राहुल, रजत पाटीदार, सरफराज खान, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), के. एस. भरत (यष्टीरक्षक), रवीचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, मोहम्मद. सिराज, मुकेश कुमार, आकाश दीप (* खेळाडूंचा प्लेईंग ११मधील समावेश फिटनेस टेस्टवर अवलंबून आहे.)

## राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोलर अॅथलेटिक फेडरेशन ऑफ इंडिया आणि रोलर अॅथलेटिक असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित रोलर ऍथलेटिक्स राष्ट्रीय चॅम्पियनशिप २०२४ स्पर्धेत पनवेलची तुर्या प्रणाली नाईक (वय ४) हिने ४०० आणि २०० मीटरमध्ये दोन कांस्यपदके पटकावली. याचबरोबर विनीत जाधव (वय ८) व याज्ञिक्य पाटील (वय १४) यांनीदेखील स्पर्धेत कांस्यपदक पटकावले.

स्पर्धा खोपोलीतील याक पब्लिक स्कूल येथे शनिवारी (दि.१०) झाली. या स्पर्धेस खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पनवेलच्या खेळाडूंनी यामध्ये चमकदार कामगिरी केली आहे.

तुर्या नाईक ही रोलर स्केटिंग राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेत पदक पटकावलेली पनवेलमधील पहिलीच खेळाडू ठरली आहे. तिला प्रसाद ढवळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. या यशाबद्दल तुर्याचे अभिनंदन होत आहे.

## ट्वेंटी-२० विश्वचषकानंतर वॉर्नर होणार आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा अनुभवी सलामीवीर फलंदाज डेव्हिड वॉर्नरने अलीकडेच त्याच्या कसोटी कारकिर्दीतील अखेरचा सामना खेळला. वॉर्नरने वनडे आणि कसोटीमधून निवृत्ती घेतल्यानंतर ट्वेंटी-२० क्रिकेटलाही राम राम करणार असल्याचे संकेत दिले आहेत. ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४नंतर वॉर्नर हा फॉरमॅट खेळणार नाही.



वॉर्नरने वनडे कारकिर्दीतील अखेरचा सामना भाराताविरुद्ध, तर कसोटीतील शेवटचा सामना पाकिस्तानविरुद्ध खेळला. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या ट्वेंटी-२० सामन्यातील चमकदार कामगिरीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना वॉर्नरने आगामी विश्वचषकात सहभागी होण्यासाठी आणि जागतिक स्तरावर आपली शानदार कारकीर्द संपवण्याची उत्सुकता व्यक्त केली. एकूणच ट्वेंटी-२० विश्वचषकानंतर निवृत्त होत असल्याचे संकेत त्याने दिले आहेत. वॉर्नरने शुक्रवारी वेस्ट विंडीजविरुद्धच्या पहिल्या ट्वेंटी-२० सामन्यात ३६ चेंडूंत ७० धावांची खेळी केली. या खेळीमुळे वॉर्नरला सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सामन्यानंतर वॉर्नर म्हणाला की, फलंदाजीसाठी चांगली खेळपट्टी होती. त्यामुळे मी धावा करताना याचा पुरेपूर फायदा घेतला. मला ट्वेंटी-२० विश्वचषक खेळायचा आहे आणि तिथेच माझी ट्वेंटी-२० कारकीर्द संपवायची आहे.


# निमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेत रायगडच्या विक्रांत जैन, अभिषेक श्रीवास्तव यांची शतके

## परभणीविरुद्धचा सामना अनिर्णीत; तीन गुणांची कमाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

विक्रांत जैन (१४१ धावा) व अभिषेक श्रीवास्तव (१११ धावा) यांनी झळकवलेल्या शतकांमुळे निमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेत रायगडने पहिल्या साखळी सामन्यात परभणीविरुद्ध पहिल्या डावात १४३ धावांची आघाडी घेतली. हा सामना अनिर्णीत राहिला, परंतु पहिल्या डावात घेतलेल्या आघाडीमुळे रायगडने या सामन्यात तीन गुणांची कमाई केली. रायगडचा दुसरा साखळी सामना झोराष्ट्रीयन संघाविरुद्ध १२ व १३ फेब्रुवारी रोजी खेळला जाणार आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे निमंत्रितांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील रायगडचा पहिला साखळी सामना परभणीविरुद्ध पुणे येथे खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना परभणीने पहिल्या डावात १८३ धावा केल्या.



रायगडने आपला पहिला डाव आठ बाद ३२६ या धावसंख्येवर घोषित केला. रायगडने पहिल्या डावात १४३ धावांची आघाडी घेतली. परभणीने दुसऱ्या डावात ९ बाद १७९ धावा केल्या. हा सामना अनिर्णीत राहिला.

रायगडच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून परभणीला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. विघ्नेश पाटील आणि संकेत गोवारी (प्रत्येकी तीन बळी) व अभिषेक श्रीवास्तव (दोन बळी) यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे परभणी संघ पहिल्या डावात १८३ धावांपर्यंतच मजल मारू शकला. ओम आगाडे (३२ धावा) व शुभम कटारे (२४ धावा) यांच्या व्यतिरिक्त परभणीचे फलंदाज रायगडच्या माऱ्याचा प्रतिकार करू शकले नाहीत.

रायगडच्या पहिल्या डावाची सुरुवात डळमळीत झाली. संघाची अवस्था चार बाद ५६ अशी झाली होती, परंतु विक्रांत जैन व अभिषेक श्रीवास्तव यांनी संयमाने फलंदाजी करून संघाचा डाव सावरला. दोघांनी पाचव्या विकेटसाठी २२४ धावांची भागीदारी केली. दोघांनी शतक शळकावले. विक्रांतने १७८ चेंडूंचा सामना करून १४१ धावा केल्या. यात २३ चौकारांचा समावेश होता. अभिषेक १११ धावा करून बाद झाला. त्याने २०८ चेंडूंतील ही खेळी १२ चौकारांनी सजवली. रायगडने आपला पहिला डाव आठ बाद ३२६ या धावसंख्येवर घोषित केला. रायगडला पहिल्या डावात १४३ धावांची आघाडी मिळाली.

परभणीचा दुसरा डाव लवकर गंडाळून रायगड या सामन्यात निर्णायक विजय मिळवेल असे वाटत होते, पण परभणीने निर्धारित वेळेत उर्वरित ४४ षटकांच्या खेळात नऊ गडी गमावून १७९ धावा केल्या. त्यामुळे हा सामना अनिर्णीत राहिला. परभणीच्या अजय शितोळे याने दुसऱ्या डावात ४६ धावा करून आपल्या संघाचा पराभव टाळला. परभणीच्या दुसऱ्या डावात अभिषेक श्रीवात याने तीन, तर संकेत गोवारीने दोन बळी घेतले. पहिल्या डावात आघाडी घेतल्यामुळे रायगडने या सामन्यात तीन गुणांची कमाई केली आहे.

## खांदा कॉलनीत आज संजय भोपी प्रीमियर लीग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक स्व. संजय भोपी यांच्या संकल्पनेतून साकारलेली खांदा कॉलनी प्रीमियर लीग ४०+ म्हणजेच संजय भोपी प्रीमियर लीग ४०+ ही स्पर्धा रविवारी (दि. ११) आयोजित करण्यात आली आहे.

आनंदी ग्रुप, संजय भोपी सोशल क्लब, अलर्ट सिटीझन फोरम, मॉर्निंग योगा ग्रुप आणि खांदा कॉलनी बॅटमिंटन क्लब यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले गेले आहे. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ७ वाजता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार असून माजी भारतीय क्रिकेटपटू व आयपीएलमधील पंजाब किंग्स संघाचे विकास प्रमुख संजय बांगर यांची प्रमुख उपस्थिती या स्पर्धेस लाभणार आहे. स्पर्धेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्व खेळाडूंना प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पृथ्वी शॉचे दमदार दीडशतक

**रायपूर : वृत्तसंस्था**

पृथ्वी शॉ (१८५ चेंडूंत १५९ धावा) व भूपेन लालवानी (१०२ धावा) या सलामीवीरांच्या शतकांच्या जोरावर मुंबईने रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या सामन्यातील पहिल्या दिवसअखेर छत्तीसगडविरुद्ध पहिल्या डावात चार बाद ३१० धावसंख्येपर्यंत मजल मारली. दिवसाचा खेळ संपला तेव्हा सूर्यांश शेडगे (१७) व हार्दिक तामोरे (१) खेळत होते.



सामन्यात नाणेफेक जिंकून मुंबईच्या संघाने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. कर्णधार अजिंक्य रहाणेचा निर्णय सलामीवीरांनी सार्थकी ठरवत मुंबईला आक्रमक सुरुवात दिली. पुनरागमन करणाऱ्या पृथ्वीने छत्तीसगडच्या गोलंदाजांना चांगलेच धारेवर धरत चौकार व षटकांची आतषबाजी केली. त्याने आपल्या खेळीत १८ चौकार व तीन षटकार लगावले. भूपेनही पृथ्वीला चांगली साथ देत शतक साजरे केले.

## राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा

# किशोर-किशोरी गटात सांगलीला, तर पुरुष महिला गटात पुण्याला दुहेरी मुकुट

**सांगली : प्रतिनिधी**

सांगलीत झालेल्या कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत किशोर-किशोरी गटातील सामन्यांचा थरार सांगलीकर क्रीडाप्रेमींनी अनुभवला. त्यामध्ये यजमान सांगलीच्या संघांनी दुहेरी विजेतेपदाला गवसणी घातली. किशोरी गटात धाराशिव व किशोर गटात ठाणे उपविजयी ठरले. पुरुष व महिला गटात पुण्याने दुहेरी विजेतेपद मान पटकावला, तर महिलांमध्ये धाराशिव आणि पुरुषांमध्ये मुंबई उपनगरला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

कुपवाड येथील अकूज ड्रीमलेंड येथे रंगलेल्या किशोरींच्या अंतिम सामन्यात यजमान सांगलीने धाराशिवचा २५-२२ असा तीन गुणांनी पराभव करीत स्पर्धेतील विजेतेपद पटकावले. किशोर गटात सांगलीने ठाण्याचा लघुत्तम आक्रमणापर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यात पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घातली.

महिला गटात पुण्याने धाराशिववर ११-१० अशी एका गुणाने मात केली. पुरुष गटात अंतिम सामन्यात पुण्याने मुंबई उपनगरवर २०-१० असा १० गुणांना विजय साकारला.




स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास सांगली जिल्हा बँकेच्या उपाध्यक्ष जयश्री पाटील, भाजप नेते शेखर इनामदार, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पद्माकर जगदाळे, नगरसेवक गजानन मगदूम, भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजीत जाधव, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव ॲड. गोविंद शर्मा, क्रीडा विभागाचे उपसंचालक माणिक पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, सांगली जिल्हा खो -खो असोसिएशनचे अध्यक्ष समीर शेख, सचिव प्रशांत इनामदार यांच्यासह अन्य मान्यवर पारितोषिक वितरणाला उपस्थित होते.

**वैयक्तिक पारितोषिके**

पुरुष व महिला गट सर्वोत्कृष्ट अष्टपैलू : आदित्य गणपुळे (पुणे), प्रियांका इंगळे (पुणे); सर्वोत्कृष्ट संरक्षक : अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर), कोमल धारवटकर (पुणे); सर्वोत्कृष्ट आक्रमक : रूद्र थोपटे (पुणे), सुहानी धोत्रे (धाराशिव).

**किशोर व किशोरी गट**

सर्वोत्कृष्ट अष्टपैलू : श्री. दळवी (सांगली), वैष्णवी चाफे (सांगली); सर्वोत्कृष्ट संरक्षक : विनायक भाणगे (ठाणे), श्रावणी तामखडे (सांगली); सर्वोत्कृष्ट आक्रमक : रितेश बिरादार (सांगली), मैथली पवार (धाराशिव).

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत यश, रण झुंजार मंडळ विजेते



**मुंबई : प्रतिनिधी**

चारचौघे मित्र मंडळ या मुंबई शहरच्या सामनाधिकाऱ्यांच्या संघटनेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत यश क्रीडा मंडळ यांनी द्वितीय, तर रण झुंजार क्रीडा मंडळ यांनी तृतीय श्रेणी गटात अंतिम विजेतेपद मिळवले. यश मंडळाचा तेजस शिंदे द्वितीय आणि श्री गणेशचा सिद्धेश सावंत तृतीय श्रेणी गटात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले.

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने श्रमिक जिमखाना येथे झालेल्या द्वितीय श्रेणीच्या अंतिम सामन्यात यश मंडळाने महालक्ष्मी मंडळाचा २८-२३ असे पराभूत करीत जेतेपदाचा चषक पटकाविला. अल्केश विचारे, तेजस शिंदे यांनी सुरुवातीपासून जोरदार चढाया करीत १४-०८ अशी आघाडी घेतली होती. त्यांना ओमकार मांजेकरची पकडीची उत्तम साथ लाभली. दुसऱ्या डावात मात्र सुर सापडलेल्या महालक्ष्मीच्या ओमकार व जयवंत या सुतार बंधूंनी कडवी लढत देत सामन्यात रंगत आणली.

तृतीय श्रेणीच्या अंतिम सामन्यात रण झुंजार मंडळाने श्री गणेश व्यायाम शाळेचा कडवा प्रतिकार २९-२८ असा निसटता मोडून काढत विजेतेपदाचा चषक उंचाविला. पूर्वार्धात ८-१७ अशा पिछाडीवर पडलेल्या रण झुंजारने उत्तरार्धात मात्र जोरदार प्रतिकार करीत एका गुणाने जेतेपदाचा मुकुट आपल्या शिरपेचात रोवला. अमोल चव्हाण, मंगेश सुहासे यांच्या उत्तरार्धातील धारदार चढायांने या विजयाची किमया साधली. त्यांना उत्तम पकडी करीत सिद्धेश बंड यांनी छान साथ दिली. सिद्धेश सावंत, सुशांत मेगाणे यांनी पूर्वार्धात उत्कृष्ट खेळ करीत श्री गणेशला नऊ गुणांची मोठी आघाडी मिळवून देण्यात यश मिळविले होते, पण उत्तरार्धात मात्र ते अगदीच ढेपाळले. त्यामुळे त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

या अगोदर झालेल्या द्वितीय श्रेणीच्या उपांत्य सामन्यात यश मंडळाने श्री साईनाथ मंडळाचा (२९-२३) असा, श्री महालक्ष्मीने आकांक्षा मंडळाला ५-५ चढायांच्या डावात ३२-२८(७-३) असा पराभव करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. यश मंडळाचा जयेश काणेकर स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचा, तर श्री महालक्ष्मीचा ओमकार सुतार चढाईचा उत्कृष्ट खेळाडू ठरला. तृतीय श्रेणी गटात रण झुंजारने प्रगती मंडळाला २८-२९ असे, तर श्री गणेश व्यायाम शाळेने बाळ गोपाळ मंडळाला ४१-२५ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती. गणेश चव्हाण, मंगेश सूहासे हे दोन्ही रण झुंजार मंडळाचे खेळाडू अनुक्रमे पकडीचे आणि चढाईचे स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू ठरले.

# श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ

## खो-खोमध्ये शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमीला दुहेरी मुकुट

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर व मुंबई उपनगरात श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचा थरार वेगवेगळ्या २२ ठिकाणी सुरू असून मुंबईतील क्रीडा क्षेत्रात खो-खो स्पर्धा (मुंबई उपनगर) वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यामंदिर येथे १० फेब्रुवारीपर्यंत चालू राहणार आहेत. या सामन्यांमध्ये १४ वर्षे मुली, १७ वर्षे मुले व मुली सहभागी होते.

स्पर्धा महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई महापालिका आणि क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने व मुंबई पोलीस, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ व मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील संबधित क्रीडा संघटना यांच्या सहकार्याने पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहेत.



१४ वर्षाखालील मुलींच्या गटात अंतिम सामना मानखुर्द स्टेशन मनपा शाळा विरुध्द विद्या प्रबोधिनी इंग्लिश स्कूल, मुलुंड या संघात झाला. या सामन्यात विद्या प्रबोधिनी संघाने ०८-०५ असा एक डाव व दोन गुणांनी मानखुर्द स्टेशन मनपा शाळेवर मात केली.

१७ वर्षाखालील मुलींच्या गटात शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमी विरुध्द नवशक्ती स्पोर्टस अकॅडमी, चेंबूर या दोन संघांत अंतिम लढत झाली. हा सामना शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमीने १०-०२ असा एक डाव आठ गुणांनी जिंकला. या विजयात दिव्या गायकवाड ४:४० मि. संरक्षण व एक गुण, धानी रोळेकर ०५:५० व दोन गुण अशी जबरदस्त कामगिरी केली. नवशक्तीकडून शिल्पा नाचणेने संघाच्या पराभवातहि उल्लेखनीय कामगिरी केली.

१७ वर्षाखालील मुलांच्या अंतिम सामण्यात शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमी विरुद्ध आय.बी. पटेल मनपा शाळा या दोन संघात झाला. या सामान्यात शिर्सेकर्स महात्माकडून खेळताना अजय राठोडने २, २.५० मी. संरक्षण करीत आक्रमणात चार गडी टिपत आपल्या संघास (१०-०७) असा एक डाव तीन गुणांनी विजय मिळवून देण्यास मोलाची कामगिरी केली. पराभूत संघाकडून सलमान झा याने उत्कृष्ट खेळ केला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com